# प्रकरण ४ थे

# प्रकरण-४ थे

## संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन.

४.१ प्रास्ताविक

४.२ शिक्षकांच्या प्रश्नावलीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन.

४.३ मुलाखतीव्दारे मिळालेल्या संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.

मुलाखत भाग-१:- ( प्राचार्य/मुख्याध्यापक व पर्यवेक्षक मुलाखत )

४.४ मुलाखत भाग-२:- ( विदयार्थी मुलाखत )

४.५ मुलाखत भाग-३:- ( पालक मुलाखत )

४.६ प्रत्यक्ष भेटीव्दारे मिळालेली संकलित माहिती.

# प्रकरण-४ थे

# संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन.

## ४.१ प्रास्ताविकः-

मागील प्रकरणांमध्ये प्रस्तुत संशोधन विषयासाठी वापरलेली संशोधनाची पद्धती, माहिती संकलनासाठी वापरलेली संशोधनाची साधने, प्रश्नावलीचे स्वरुप, मुलाखतीची पद्धती, संशोधनासाठी नमुना निवड व संशोधनाच्या माहितीचा उद्‌गम या विषयी माहिती आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रशिक्षण घेत असलेल्या ५० शिक्षक प्रतिसादकांकडून प्रश्नावली व्दारे संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे.

तसेच तांत्रिक व व्यावसायकि विभागांची सद्यःस्थिती जाणून घेऊन सुधारणा करण्यायच्या दृष्टीने संशोधकाने १२ तांत्रिक व व्यावसायकि विभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या १२ प्राचार्य, १२ पर्यवेक्षक व ५० विद्यार्थी प्रशिक्षणार्थी आणि ५० संबंधित पालकांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. त्याव्दारे मिळालेल्या संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन केलेले आहे.

तसेच सदर तांत्रिक व व्यावसायिक आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था या विभागांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. या भेटीव्दारे त्या ठिकाणी चालू असलेल्या प्रशिक्षणाचे निरीक्षण केले. त्या प्रशिक्षण संस्थेचा परिसर, साहित्य सामुग्री, कार्यशाळा, व इतर भौतिक सुविधा यांची या प्रत्यक्ष भेटीव्दारे माहिती संकलित केली. या संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

संशोधकाने विषयाच्या एकूण उददि्ष्टांनुसार प्रश्नावली तयार केली आहे व सदर प्रश्नावली लवकर भरुन देण्याविषयीचे एक विनंतीपत्रही सोबत जोडले आहे. ते परिशिष्ठ मध्ये दिले आहे.

संशोधकाने सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक शाळांना भेटी देण्यासाठी प्रथम महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला, डफरीन चौक सोलापूर. यांच्या कार्यालयातून शहरातील एकूण तांत्रिक व व्यावसायिक शाळांची यादी मिळविली व त्या यादीनुसार शहरातील तांत्रिक (माध्यमिक) व व्यावसायिक (उच्च माध्यमिक) शाळांची संख्या काढली. त्यामध्ये तांत्रिक शाळा (माध्यमिक)-४ व व्यावसायिक शाळा (उच्च माध्यमिक)-८ आढळल्या. या शाळांमधून तांत्रिक विषयाचे व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देणा-या शिक्षकांची संख्या काढण्यात आली त्यामध्ये इतर विषयाचे अध्यापन करणा-या शिक्षकांचा समावेश केलेला नाही. फक्त तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देणारे संबंधित शिक्षक प्रतिसादक म्हणून निवडलेले आहेत.

संशोधकाने सदर शाळांना भेटी देऊन या प्रश्नावल्यांचे वाटप केले. हया प्रश्नावल्या भरुन घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष मार्च/एप्रिल,२००० ते सप्टेंबर/ऑक्टोबर २००० या कालावधीचा उपयोग केला. या कालावधीत अधून मधून स्थानिक शिक्षकांकडून प्रश्नावल्या भरुन घेऊन माहिती संकलित केली. काही शिक्षकांनी प्रश्नावल्या तात्काळ भरुन दिल्या व काही शिक्षकांनी प्रश्नावल्या भरुन देण्यासाठी थोडा कालावधी देण्याची विनंती केली. नंतर काही कालावधी शिक्षक प्रतिसादकांना देऊन जवळजवळ ५० शिक्षकांकडून हया प्रश्नावल्या भरुन घेतल्या व त्यांचे शालेय व वैयक्तिक माहिती

मिळविली. प्रश्नावलीतील विभागानुसार सुरुवातीला प्रस्तावनेच्या रुपात प्रतिसादकाचे संपूर्ण नांव, पत्ता, परिशिष्ठ क्र.५ मध्ये दिलेली आहे.

## ४.२ शिक्षकांच्या प्रश्नावलीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनः-

१. तांत्रिक व व्यावसायिक शाळांत अध्यापन करणा-या शिक्षकांची (प्रतिसादकांची) संख्या व वैयक्तिक माहिती.

-: कोष्टक क्र. ४.२.१ :-

| अ.क्र. | शिक्षकांची संख्या | शेकडा प्रमाण | एकूण |
|---|---|---|---|
| १ | ५० | १०० % | ५० |

विभागाप्रमाणे शिक्षकांची विभागणी केलेली आहे (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षकांची शाखा निहाय विभागणी.

| अ.क्र. | माध्यमिक शिक्षक | उच्च माध्यमिक शिक्षक | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | १८ | ३२ | ५० | १०० % |

८ प्रश्नावल्या ५० आहेत. शेकडा प्रमाण प्रतिसादक संख्या दाखविणे आवश्यक आहे म्हणून शेवटच्या रकान्यात शेकडा प्रमाण दर्शविणारा रकाना दिला आहे.

कोष्टक क्र.४.१ वरुन असे आढळून आले की, एकूण प्रतिसादकांपैकी ३६ टक्के माध्यमिक शिक्षक व ६४ % उच्च माध्यमिक शिक्षक आहेत.

प्रश्नावली भरुन देणा-या शिक्षकांचे शाळा निहाय वर्गीकरण.

-:कोष्टक क्र. ४.२.२:-

| अ.क्र. | शाळेचे नांव | प्रश्नावली संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला | ०६ | १२ % |
| २ | श्री दिगंबर जैन गुरुकुल तांत्रिक शाळा | ०४ | ०८ % |
| ३ | श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य तांत्रिक शाळा | ०४ | ०८ % |
| ४ | प. श्री. सुमतीबाई शहा इंग्लिश मिडियम स्कूल | ०४ | ०८ % |
| ५ | महाराष्ट्र राज्य व्यावसायिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| ६ | श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य व्यावसायिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| ७ | कुचन व्यावसायिक व तांत्रिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| ८ | आण्णासाहेब पाटील तांत्रिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| ९ | नूतन तांत्रिक तथा व्यावसायिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| १० | श्री छत्रपती शिवाजी मराठा महासंघ व्यावसायिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| ११ | संभाजीराव शिंदे व्यावसायिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| १२ | श्री दिगंबर जैन गुरुकुल व्यावसायिक महाविद्यालय | ०४ | ०८ % |
| | एकूण......... | ५० | १०० % |

शिक्षक प्रश्नावलीमध्ये सुरुवातीस शिक्षकांची वैयक्तिक माहिती पाहिली. त्याच विभागामध्ये शाळेचे नांव विचारलेले आहे. त्याप्रमाणे सदर कोष्टकात शाळेचे नांव, प्रकार व शिक्षक प्रतिसादकांची संख्या दिलेल्या आहेत.

वरील कोष्टका वरुन असे आढळते की, सोलापूर शहरातील एकूण तांत्रिक व व्यावसायिक शाळांपैकी सुरुवातीस दर्शविलेल्या अनुक्रमे चार शाळा या तांत्रिक माध्यमिक आहेत व अनुक्रमांक ५ ते १२ या आठ शाळा या उच्च माध्यमिक व्यावसायिक महाविद्यालये आहेत. म्हणजेच सोलापूर शहरामध्ये माध्यमिक तांत्रिक पेक्षा उच्च माध्यमिक व्यावसायिक शाळांची संख्या अधिक आहे.

प्रस्तुत कोष्टकात पहिला रकाना हा अनुक्रमांक , दुसरा रकाना तांत्रिक व व्यावसायिक शाळेचे नांव, तिसरा रकाना प्रश्नावलीस प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या व शेवटचा रकाना एकूण शेकडा प्रमाण दर्शवितो.

३. शिक्षक प्रतिसादकांची वैयक्तिक माहिती यामध्ये प्रश्नावलीच्या सुरुवातीला दिलेल्या एकूण माहिती वजा प्रश्नात शिक्षकांची शैक्षणिक अर्हता विचारलेली आहे. त्यानुसार त्यांची शैक्षणिक अर्हता व एकूण संख्या शेकडा प्रमाण दिले आहे.

-: कोष्टक क्र.४.२.३ :-

शिक्षक प्रतिसादकांची शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | प्रतिसादक शिक्षकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी (आय.टी.आय ) | १५ | ३० % |
| २ | डिप्लोमा | ३० | ६०% |
| ३ | इंजिनियरिंग | ०५ | १० % |
| | एकूण.......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.३ वरुन खालील बाबी आढळून आल्या.

१. तांत्रिक माध्यमिक शाळांना शिकविणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची शैक्षणिक अर्हता जवळजवळ एस.सी.सी. , आय.टी.आय. , एन.सी.टी.व्ही.टी. अशी आहे.

२. डिप्लोमा पदवी धारण केलेल्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या सर्वात जास्त आहे.

३. इंजिनियरिंग पदवीका धारण केलेल्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या अत्यंत कमी आहे.

या तीनही शैक्षणिक अर्हतेवरुन असे आढळते की, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळांत डिप्लोमा पदवी धारण केलेले शिक्षक अधिक आहेत. आय.टी.आय. पदवी-शिक्षक संख्या १५ - त्यांचे शेकडा प्रमाण ३०%, डिप्लोमा -३० त्याचे शेकडा प्रमाण ६० %, आणि

अभियांत्रिकी (इंजिनियरिंग)-५ शेकडा प्रमाण-१० टक्के व एकूण शिक्षण प्रतिसाादक ५० - त्याचे शेकडा प्रमाण १०० %. इत्यादी माहिती या ठिकाणी नमुद केली आहे.

अशा प्रकारे तांत्रिक व व्यावसायिक शाळांत अध्यापन करणा-या शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये विविधता आढळून येते.

४. तांत्रिक व व्यावसायिक शाळांत अध्यापन अनुभवावरुन शिक्षक प्रतिसादकांचे वर्गीकरण केलेले आहे. शिक्षक प्रतिसादकांची वैयक्तिक माहिती या घटकामधील हा पुढचा मुद्दा स्पष्ट होतो. या अध्यापन अनुभवाकरुन शिक्षक प्रतिसादकांचे मत जाणून घेणे संशोधन प्रक्रियेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.४:-
अध्यापन अनुभवावरुन शिक्षक प्रतिसादकांचे वर्गीकरण.

| अ.क्र. | अध्यापनाचा अनुभव वर्ष | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ००-०५ वर्षे | १० | २० % |
| २ | ०६-१० वर्षे | १२ | २४ % |
| ३ | ११-१५ वर्षे | १६ | ३२ % |
| ४ | १६-२० वर्षे | ०६ | १२ % |
| ५ | २१-२५ वर्षे | ०४ | ०८ % |
| ६ | २६ च्या पुढे | ०२ | ०४ % |
| | एकूण........ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४ वरुन असे आढळून येते की,

१) ११ ते १५ वर्षे अध्यापनाचा अनुभव असणारे शिक्षक प्रतिसादकांचे प्रमाण ३२% आहे ते सर्वात जास्त आहे.

२) २६ वर्षे च्या पुढे अनुभव असणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांचे प्रमाण ४% आहे. ते सर्वात कमी आहे. म्हणजेच ४% अध्यापन करणारे तांत्रिक व व्यावसायिक शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शनपर अध्यापन हे नक्कीच परिणाम कारक आहे. त्यांच्या पाठीशी अनुभव मोठा आहे. नवीन शिक्षकांनी त्यांच्या कडून विविध कौशल्य संपादन करुन परंपरा पुढे कायम ठेवावी.

३) ० - ५ वर्षे अध्यापनाचा अनुभव असणाऱ्या शिक्षकांची संख्या व ६ - १० वर्षे अध्यापनाचा अनुभव असणाऱ्या शिक्षकांची संख्या जवळजवळ सारखीच आहे. त्यांचे शेकडा प्रमाण २०% व २४% असे आहे. म्हणजेच तांत्रिक व व्यावसायिक शाळा नव्याने सुरु झालेल्या असून त्या ठिकाणी नवीन शिक्षक भरती झालेले आहेत. म्हणजेच सुरुवातीचे १० वर्षे नवीन शाळा, नवीन शिक्षक दर्शवितात.

४) तसेच १६ - २० व २१ - २५ वर्षेअध्यापनाचा अनुभव असणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ६ व ४ म्हणजेच शेकडा प्रमाण १२% व ०८% असे आहे. एकूण २०% या वरुन असे दिसून येते की, एकूण प्रतिसादकांपैकी २०% प्रतिसादक या प्रकारात मोडतात.

५) याच्या आधीच्या कोष्टकात शिक्षकांचा एकूण अनुभव व त्यांची संख्या दर्शविली होती. या कोष्टकात त्यांची अध्यापनाची सुरुवात व सन संख्या आणि शेकडा प्रमाण दर्शविलेले आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.५:-
तांत्रिक व व्यावसायिक शाळांत अध्यापन अनुभव वर्षानुसार वर्गीकरण.

| अ.क्र. | तांत्रिक व व्यावसायिक शाळांतील अध्यापन अनुभव | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | इ.स. ६५ पासून ३५ वर्षे | ०२ | ०४ % |
| २ | इ.स. ८० पासून २०वर्षे | १० | २० % |
| ३ | इ.स. ९० पासून १०वर्षे | १६ | ३२ % |
| ४ | इ.स. ९५ पासून ५ वर्षे | १२ | २४ % |
| ५ | इ.स.२००० पासून २ वर्षे | १० | २० % |
| | एकूण......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्र. ४.२.५ वरुन अनुभवाबाबत ,खालील गोष्टी आढळून आल्या.

१) तांत्रिक व व्यावसायिक शाळांत रुजू झाल्यापासून शिक्षकांची संख्या २ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ४ टक्के होते. त्यांचा सदर शाळेतील अनुभव हा ३५ वर्षापेक्षाही जास्त आहे.

२) तसेच सर्वात कमी अनुभव म्हणजे शाळेमध्ये रुजू झाल्यापासून फक्त १ ते ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या हि १० आहे. त्यांचे शेकडा प्रमाण २० टक्के होते. त्यांचा अनुभव हा अत्यंत कमी आहे.

३) वरील कोष्टकांचा अभ्यास केला असता नवीन शिक्षकांचे प्रमाण हे जुन्या शिक्षकांच्या प्रमाणापेक्षा अधिक आहे असे आढळते.

६ शिक्षक प्रतिसादक प्रश्नावली मधील - शिक्षकांची वैयक्तिक माहिती या घटकांमध्ये शेवटचा भाग म्हणजे शिक्षकांचा अध्यापनाचा विषय व त्यांचे प्रशिक्षण नियोजन. यामध्ये शिक्षकांच्या विविध संपादित पदव्यांच्या विषयांचा समावेश आहे.

-: कोष्टक क्र. ४.२.६ :-

विषय निहाय शिक्षकांचे वर्गीकरण.

| अ.क्र. | अध्यापनाचा विषय | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | फिटर | ०४ | ०८ % |
| २ | वेल्डर | ०३ | ०६ % |
| ३ | मोल्डर | ०५ | १० % |
| ४ | प्लंबर | ०४ | ०८ % |
| ५ | मेकॅनिकल | ०५ | १० % |
| ६ | कारपेंटर | ०७ | १४ % |
| ७ | ॲटो | ०४ | ०८ % |
| ८ | इलेक्ट्रीकल | ०६ | १२ % |
| ९ | मेडिकल लॅब टेक्निशिअन | ०१ | ०२ % |
| १० | कॉम्प्यूटर | ०४ | ०८ % |
| ११ | सिव्हिल | ०२ | ०४ % |
| १२ | हॉर्टिकल्चर | ०१ | ०२ % |
| १३ | अकौंट | ०१ | ०२ % |
| १४ | व्हिविंग ॲण्ड स्पिनिंग | ०१ | ०२ % |
| १५ | इलेक्ट्रॉनिक्स | ०२ | ०४ % |
| | एकूण.......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.६ वरुन खालील बाबी आढळून आल्या.

१)  कारपेंटरी विषय शिकविणा-या शिक्षकांचे प्रमाण प्रत्येकी १४% आहे. ते सर्वात जास्त आहे. तसेच त्याच्या पाठोपाठ इलेक्ट्रीकल विषयाचे अध्यापन करणा-या शिक्षकांचा क्रमांक येतो त्यांचे शेकडा प्रमाण हे १२% आहे. म्हणजेच इतर विषयांची तुलना करता कारपेंटरी व इलेक्ट्रीकल विषयाचे अध्यापन करणा-या शिक्षकांची संख्या ही सर्वात जास्त आहे. त्यांची संख्या एकूण याठिकाणी ०७ आणि ०६ अशी आहे.

२)  व्हिविंग ॲण्ड स्पिनिंग , अकौंट, हॉर्टिकल्चर, मेडिकल लॅब टेक्निशियन प्रत्येकी-१ आणि सिव्हिल, मोल्डिंग व वेल्डींग प्रत्येकी २ ते ३ विषय संख्या असणा-या विषय शिक्षकांचे प्रमाण हे अतिशय कमी आहे. त्यांची टक्केवारी २%, ४%, व ६% अशी आहे. यावरुन असे दिसून येते की, या विषयांना येथील वातावरणामध्ये कमी महत्व दिले. याची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

३)  फिटर, इलेक्टॉनिक्स, मॅकॅनिकल, ॲटो व कॉम्प्यूटर या विषयांचे अध्यापन करणा-या शिक्षकांची संख्या ४ व ५ अशी आहे. म्हणजेच इतर विषयांपेक्षा या विषयाकडे देखील शाळांनी अधिक लक्ष दिले आहे. त्याचे शेकडा प्रमाण प्रत्येकी ८% व १०% असे आहे.

-: विभाग दोन :-

शिक्षक प्रतिसादक ज्या संस्थेत अध्यापनाचे कार्य करतो त्या संस्थेत तो कायम स्वरुपी शिक्षक आहे का? याबद्दल प्रश्न विभाग दोनच्या सुरुवातीस विचारलेला आहे. या प्रश्नावलीतील या प्रश्नास खालील प्रमाणे उत्तर मिळाले.

-:कोष्टक क्र. ४.२.७:-

घटक-१:- आपण अध्यापन करीत असलेल्या संस्थेत कायम स्वरुपी आहात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४७ | ९४ % |
| २ | नाही | ०३ | ०६ % |
| | एकूण......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.७ वरुन पुढील बाबी आढळून आल्या.

१). तांत्रिक व व्यावसायिक शाळांना पाठविलेल्या प्रश्नावली प्रमाणे - सदर शाळांत अध्यापन करणा-या शिक्षकांपैकी ४७ शिक्षक हे कायमस्वरुपी व ०३ शिक्षक हे तात्पुरते आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ९४% आणि ०६% असे होते.

केवळ ०६ टक्के शिक्षक हे तात्पुरते असल्याने त्यांची संख्या कमी आहे. यावरुन असे निष्पन्न होते की, सोलापूर शहरातील जवळजवळ सर्वच तांत्रिक व व्यावसायिक शाळा या अनुदानित आहेत व त्या ठिकाणी अध्यापन करीत असलेले ९४ टक्के शिक्षक हे कायम स्वरुपी आहेत. हे सर्व शिक्षक कायमस्वरुपी असल्यामुळे त्यांना आपल्या जबाबदारीची पूर्णपणे जाणीव आहे.

प्रश्न क्रमांक १ मध्ये शाळेच्या प्रकाराबद्दल माहिती विचारलेली होती. त्यांचे वर्गीकरण पुढील कोष्टक क्रमांक ४.२.८ मध्ये दिले आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.८:- अ

घटक-२:- आपली संस्था खालील पैकी कोणत्या प्रकाराशी संबंधीत आहे?

| अ.क्र. | प्रतिसाद/पर्याय | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अ. शासकीय | १० | २० % |
| २ | ब. खाजगी:- | | |
| | १. अनुदानित | ४० | ८० % |
| | २. विना अनुदानित | — | — |
| | ३. अंशतः अनुदानित | — | — |
| | एकूण………… | ५० | १०० टक्के |

१) वरील कोष्टक क्रमांक ४.२.८ वरुन असे दिसून येते की, सदर प्रतिसादकांची शाळा ही अनुदानित आहे. शासकीय तांत्रिक व व्यावसायिक शाळांपैकी अशासकीय तांत्रिक शाळांची संख्या अधिक आहे. अनुदानित तांत्रिक व व्यावसायिक शाळांची संख्या ४० आहे त्याचे शेकडा प्रमाण ८०% होते.

२) उर्वरित २०% तांत्रिक व व्यावसायिक शाळा या शासकीय स्वरुपाच्या आहेत. या ठिकाणी शासनाने सुरुवातीस सुरु केलेली महाराष्ट्र राज्य तांत्रिक तथा औदयोगिक शाळा हिच फक्त शासकीय ठेवून बाकीच्या शाळांना फक्त अनुदान प्राप्त करुन दिलेले आहे.

यावरुन असे दिसून येते की, सोलापूर शहरामध्ये खाजगी तांत्रिक व व्यावसायिक शाळांचे जाळे पसरलेले आहे. व त्या सर्व संबंधीत शाळांना शासनाने मान्यता देवून अनुदान चालू केलेले आहे.

-: कोष्टक क्र. ४.२.८ :- ब

घटक-३:- आपणांस मिळणा-या वेतनाबाबत आपण समाधानी आहात काय?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३२ | ६४ % |
| २ | नाही | १८ | ३६ % |
| | एकूण.......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.८ वरुन पुढील बाबी आढळून आल्या.

१) तसे पाहता आपल्याला मिळणा-या वेतनाबाबत सर्वच कर्मचारी नाराज असतात. या ठिकाणी कोष्टकात प्रतिसाद होय म्हणणा-यांची संख्या जास्त आहे. संशोधकाने यासाठी मुलाखती सुद्धा घेतल्या होत्या. त्यावरुन असे निष्पन्न होते की, माध्यमिक तांत्रिक शाळेत अध्यापन करणारे कर्मचारी हे मिळणा-या वेतनाबद्दल नाराज आहेत. कारण त्याच संस्थेत, तांत्रिक माध्यमिक शाळेत अध्यापन करणा-या इतर विषय शिक्षकांना या शिक्षकांपेक्षा अधिक वेतन आहे.

याठिकाणी कोष्टकात प्रश्नास होय उत्तर देणा-या प्रतिसादक हा बहुतेक उच्च माध्यमिक व्यावसायिक महाविद्यालयातील असावा. त्यांची संख्या ३२ आहे व शेकडा प्रमाणात त्यांची संख्या ६४% अशी होते.

२) मिळणा-या वेतनश्रेणी बद्दल १८ प्रतिसादक नाराज आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ३६% असे होते. तेंव्हा ही संख्या ६४% च्या मानाने कमी आहे. तेव्हां या १८ प्रतिसादकांने आपल्याला मिळणा-या वेतनाबाबत नाराज होऊ नये व याची तुलना दुस-या शिक्षकांबरोबर सुद्धा होता कामा नये. त्यासाठी त्यांनी आपली श्रेणी पहावी. डिप्लोमाधारक श्रेणी असेल तर शाळेमधील डी.एड. पदवीधारक शिक्षकांप्रमाणे श्रेणी निश्चित केलेली असावी. तसेच बी.ई. असेल तर बी.एड. शिक्षकांची श्रेणी त्यांना लागू होईल. या प्रकारचा थोडा विचार या ठिकाणी होणे आवश्यक आहे. याप्रमाणे तांत्रिक माध्यमिक शिक्षकांनी इतर ६४% प्रतिसादक शिक्षकांचा सल्ला घेऊन मार्गदर्शन प्राप्त करावे.

-: कोष्टक क्र. ४.२.९ :-

घटक-४:- आपणांस पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन प्राप्त होते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.९ वरुन पुढील बाबी आढळतात.

१) वरील प्रतिसादकाला विचारलेल्या प्रश्नास जवळजवळ सर्वच प्रतिसादकांनी होय उत्तर दिले. म्हणजे सर्वच शिक्षक पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन घेत आहेत.

या वेतन आयोगाने त्यांना नाराज केले की खूश केले हि त्यांची वैयक्तिक बाब आहे. परंतु पाचवा वेतन आयोग सर्वापर्यन्त पोचला हे महत्वाचे आहे. या ठिकाणी प्रश्नास होय उत्तर देणा-या प्रतिसादकांची संख्या ५० आहे व ही संख्या पूर्ण आहे त्याचे शेकडा प्रमाण १००% असे होते. म्हणजेच पाचवा वेतन आयोग हे शिक्षक घेत आहेत.

-:कोष्टक क्र. ४.२.१०:-

घाटक-५:- अदयाप आपण आपल्या विषयाच्या उद्बोधन वर्गास उपस्थित राहिलात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४४ | ८८ % |
| २ | नाही | ०६ | १२ % |
| | एकूण... | ५० | १०० % |

वरील कोष्टाक क्रमांक ४.२.९ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) अदयाप आपण आपल्या विषयाच्या उद्बोधन वर्गास उपस्थित राहिलात का? या प्रश्नास ४४ प्रतिसादकांनी होय असे उत्तर दिले आहे. त्याचे शेकडा प्रमाण ८८% होते व हे शेकडा प्रमाण जास्त आहे.

याचा अर्थ असा की, प्रत्येक विषय शिक्षक हा आपल्या स्वतःच्या विषयाबद्दल जागृत असतो व त्याला आपल्या विषयाचा अभिमान वाटतो. आणि हे साहजिक आहे. 'नाही' उत्तर देणा-या शिक्षकांची संख्या ०६ आहे. हे प्रमाण अतिशय कमी आहे. शक्यतो सदर शिक्षक हे नवीन आहेत. त्यांनी संधीचा फायदा घेवून आपल्या विषयाच्या उद्बोधन वर्गास हजर रहावे. यामुळे आपल्या विषयाच्या सदयःस्थितीची जाणीव आपणास होते. सदर विषयाबद्दल अधिक माहिती संकलित करण्यास सोपे जाते. आपल्या समोर असणा-या विदयार्थ्यांना आपला विषय अधिक विस्तृत पणे सोपा करून सांगता येतो.

-:कोष्टक क्र. ४.२.११:-

घटक-६:- व्यावसायिक शिक्षणाच्या अध्यापनाच्या सदयःस्थितीबद्दल आपण समाधानी आहात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | २४ % |
| २ | नाही | ३८ | ७६ % |
| | एकूण......... | ५० | १०० % |

वरील कोष्टाक क्रमांक ४.२.११ वरुन खालील बाबी लक्षात येतात.

१) तांत्रिक व व्यावसायिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांत अध्यापन करणा-या शिक्षकांनी दिलेल्या प्रश्नावलीस चांगला प्रतिसाद दिला आहे.

व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाच्या अध्यापनाबद्दल विचारलेल्या प्रश्नास ३८ शिक्षकांनी समाधानी नाही असा प्रतिसाद दिला आहे. हा आकडा जास्त आहे. तेंव्हा या शिक्षकांच्या अध्यापनामध्ये आडव्या येणा-या समस्यांचा अभ्यास आवश्यक आहे. सदर शिक्षक हे विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या प्रशिक्षणाबद्दल नाराज आहेत. या शिक्षकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे प्रशिक्षण कार्य पूर्ण करता येत नाही. प्रशिक्षणासाठी मिळणा-या साधन साहित्य आणि अनुदान बद्दल ते नाराज आहेत. सदर प्रश्नास 'नाही' उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ६६% होते. तसेच 'होय' म्हणणारे शिक्षक १२ आहेत त्यांचे शेकडा प्रमाण २४% आहे. तेव्हां हे प्रमाण कमी आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.१२:-

घटक-७:- या संस्थेमध्ये रुजू झाल्यापासून आपली बदली इतरत्र कोठे झाली आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | २० % |
| २ | नाही | ४० | ८० % |
| | एकूण.......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१२ वरुन खालील माहिती मिळते.

१) संस्थेमध्ये रुजू झाल्यापासून सदर शिक्षकांची इतरत्र कोठे बदली झाली का? या प्रश्नास ४० प्रतिसादकांनी 'नाही' असे उत्तर दिले. याचे

शेकडा प्रमाण ८०% होते. बहुतेक सदर सर्व शिक्षक हे संस्थेमध्ये अध्यापनाचे कार्य करीत असावेत. व त्या संस्थेच्या शाखा कमी असाव्यात. म्हणून त्यांनी बदली करण्याचा प्रसंग उद्‌भवत नसेल. तसेच या बदलीच्या प्रश्नास 'होय' उत्तर देणा-यांची संख्या १० आहे त्यांचे शेकडा प्रमाण २०% होते. व हे प्रमाण कमी आहे. सदर 'होय' म्हणून प्रतिसादक हे शासकीय शाळांत काम करणारे असावेत कारण शासकीय संस्थेत सतत बदल्या होत असतात. या बदल्यांचे अनेक प्रकार आहेत त्यामुळे बदली ( प्रमोशन ) व शिक्षा ( पनीशमेंट ) प्रसिद्ध आहेत व काही इच्छा बदली असा प्रकार आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.१३:-

घटक-८:- शिक्षकांच्या होणा-या बदल्याबाबत आपण समाधानी आहात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ७० % |
| २ | नाही | १५ | ३० % |
| | एकूण | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१३ वरुन खालील बाबी आढळून आल्या.

१) या ठिकाणी शिक्षकांच्या होणा-या बदल्याबाबत प्रश्न विचारला होता या प्रश्नास ३५ शिक्षक प्रतिसादकांनी 'होय' असे उत्तर दिले. याचे शेकडा प्रमाण ७०% होते व हे प्रमाण जास्त आहे. तेंव्हा जवळजवळ ७०% शिक्षक होणा-या बदल्याबाबत समाधानी असतात. कदाचित हे शिक्षक खाजगी

संस्थेमधील म्हणजे ज्या ठिकाणी एकापेक्षा जास्त शाखा नाहीत. या शिक्षकांना एकाच शाळेचा कंटाळा आला असावा. नवीन वातावरणाला तोंड देण्यासाठी त्यांची मनोकामना असावी. याच्या उलट 'नाही' असे उत्तर देणा-या शिक्षकांची संख्या १५ आहे. याचे शेकडा प्रमाण ३०% होते. तेंव्हा या शिक्षकांना बदली म्हणजे कठीण प्रसंग वाटत असावेत किंवा यांच्या बदल्या झालेल्या असाव्यात.

-:कोष्टक क्र. ४.२.१४:-

घटक-९:- व्यावसायिक प्रशिक्षणाव्यतिरिक्त क्रीडा विभागाकडे लक्ष देता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | ६० % |
| २ | नाही | २० | ४० % |
| | एकूण......... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१४ वरुन खालील गोष्टी निष्पन्न होतात.

१) तांत्रिक व व्यावसायिक शाळांत त्याठिकाणी देण्यात येणा-या प्रशिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना क्रीडा विषयक माहिती देऊन त्यांच्या मध्ये विविध खेळांबद्दल गोडी निर्माण करणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांला प्रशिक्षणाबरोबर खेळाच्या माध्यमातून शारिरीक दृष्टया तंदुरुस्त बनविता येते. सदर प्रश्नास 'होय' असे उत्तर देणा-या शिक्षकांची संख्या ३० आहे त्याचे शेकडा प्रमाण ६० आहे. त्यांचे प्रमाण इतर शिक्षकांच्या मानाने अधिक आहे. 'नाही' असे उत्तर देणारे शिक्षक २० आहेत त्याचे शेकडा प्रमाण ४० होते हे प्रमाण कमी आहे.

प्रत्येक शिक्षकाला प्रत्येक खेळाबद्दल प्राथमिक माहिती असणे आवश्यक असते. व क्रीडा विषयक माहिती घेऊन विद्यार्थ्यांना त्याचे महत्व पटवून सांगणे गरजेचे आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.१५:-
घटक-१०:- व्यावसायिक शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी स्त्री-पुरुष असा भेदभाव असतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | — | — |
| २ | नाही | ५० | १०० टक्के |
| | एकूण.......... | ५० | १०० टक्के |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१५ वरुन खालील बाबी लक्षात येतात.

१) भारतामध्ये आता पूर्वीसारखी परिस्थिती राहिली नाही. सर्व क्षेत्रात स्त्रीयांनी आपला ठसा उमठविला आहे. स्त्रीयांनी प्रत्येक क्षेत्रात प्रवेश करुन त्या ठिकाणी अगदी उत्साहाने प्रशिक्षण घेत आहेत व मुलांपेक्षा चांगले गुण प्राप्त करीत आहेत.

आज जगामध्ये अशी कमी क्षेत्रे आहेत की ज्या ठिकाणी स्त्रीयांचा अभाव आहे. नाहीतर जगातील प्रत्येक क्षेत्रात स्त्रीयांनी आपली जागा निर्माण केली आहे.

याठिकाणी सदर प्रश्नास पूर्ण प्रतिसाद मिळाला आहे - व्यावसायिक शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी स्त्री-पुरुष असा भेदभाव होतो असे कोणत्याही प्रतिसादकाला वाटत नाही. 'होय' असे उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकाची संख्या ५० आहे त्याचे शेकडा प्रमाण १००% व हे प्रमाण जास्त आहे. 'नाही' उत्तर देणारे प्रतिसादक नाहीत. म्हणजेच या ठिकाणी स्त्री-पुरुष या दोघांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण घेता येते व सदर कोणत्याही तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमापासून त्यांना वंचित ठेवता येत नाही.

-:कोष्टक क्र. ४.२.१६:-

घटक-११:- शाळेतील व्यावसायिक शिक्षणाच्या अध्यापना व्यतिरिक्त आपल्या विषयाशी संबंधीत व्यवसाय करता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | — | — |
| २ | नाही | ५० | १०० % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१६ वरुन खालील बाबी निघातात.

१) शाळेतील व्यावसायिक शिक्षणाच्या अध्यापनाशिवाय इतर संबंधीत व्यवसाय करता का? या प्रश्नास सर्वच शिक्षकांनी 'नाही' असे उत्तर दिले. त्यांची संख्या ५० आहे व शेकडा प्रमाण १००% होते.

म्हणजेच जवळजवळ सर्वच तांत्रिक आणि व्यावसायिक विषयाचे अध्यापन करणारे शिक्षक आपल्या शालेय कामकाजावर समाधानी आहेत. त्यांना उपजीविकेसाठी किंवा आवड म्हणून एखादा व्यवसाय करावा असे वाटत नाही.

उदा- कारपेंटरी विषय असणारे शिक्षक बाहेर सुतारकाम करु शकतात किंवा कॉन्ट्रॅक्ट घेऊ शकतात. पेंटींग करु शकतात, इलेक्ट्रीक काम करु शकतात परंतु या ठिकाणी सर्वच शिक्षकांनी बाहेर कोणत्याच प्रकारचे काम करीत नाही असे उत्तर दिले आहे. जर संस्थेतर्फे अथवा शासनातर्फे तशी बंदी असेल तर आपला निर्णय योग्य आहे असे म्हणता येईल. परंतु आवड असेल तर छोटी कामे घरी करावीत त्यामुळे आपल्या विषयाच्या प्रशिक्षणाबद्दल सातत्य राहते व नवीन कौशल्य आत्मसात करता येतात.

-:कोष्टक क्र. ४.२.१७:-

घटक-१२:- आपल्या संस्थेतील व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांस 'आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेला आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १५ | ३० % |
| २ | नाही | ३५ | ७० % |
| | एकूण............ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१७ वरुन खालील गोष्टी आढळतात.

१) आपणांस आदर्श शिक्षक पुरस्कार मिळावा असे प्रत्येक शिक्षकाचे स्वप्न असते. त्यासाठी सदर शिक्षकास सर्वांगिण ज्ञान असणे गरजेचे असते. या ठिकाणी क्रीडा, गुणवत्ता, उपक्रम, सामाजिक कार्य व बुद्धीमत्ता इत्यादी गोष्टींचा ढोबळ मानाने विचार असतो.

वरील कोष्टकात विचारलेल्या प्रश्नास 'नाही' असे उत्तर देणारे ३५ शिक्षक प्रतिसादक आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ७०% होते व हे प्रमाण जास्त आहे. तेव्हां 'आदर्श शिक्षक' हा पुरस्कार माध्यमिक शिक्षकास त्यामध्ये तांत्रिक व व्यावसायिक शिक्षकास अत्यंत दुर्मिळ आहे. 'होय' उत्तर देणारे १५ शिक्षक प्रतिसादक आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ३० होते. हे प्रमाण अगदी कमी आहे.

म्हणजेच शिक्षकांनी आपल्या विषयाच्या अध्यापनाव्यतिरिक्त इतर शालेय उपक्रमाकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.१८:-

घटक-१३:- आपल्याला 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मिळेल असे वाटते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | ६० % |
| २ | नाही | २० | ४० % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१८ वरुन खालील बाबी स्पष्ट झाल्या.

१) काही शिक्षक आपल्याला एखादा पुरस्कार मिळावा म्हणून काम करतात तर याच्या उलट काही शिक्षक आपले काम हे काम आहे त्याच्यामध्ये कसल्याही प्रकारची चूक नसावी व त्याचा विद्यार्थ्याला पुरेपूर फायदा मिळावा तसेच कोणत्याही उपक्रमामध्ये भाग न घेता फक्त वर्ग अध्यापनात समाधान मानतात.

या ठिकाणी सदर कोष्टकात आपल्याला पुरस्कार मिळावा या प्रश्नास उत्तर देणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांमध्ये 'होय' म्हणणारे ३० आहेत व त्याचे शेकडा प्रमाण ६० टक्के असे आहे . हे प्रमाण जास्त आहे तसेच 'नाही' असे उत्तर देणारे कमी आहेत. त्यांची संख्या २० आहे व त्याचे शेकडा प्रमाण ४० होते. यावरुन बऱ्याच शिक्षकांना आपल्याला 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मिळावा असे वाटते.

-:कोष्टक क्र. ४.२.१९:-

घटक-१४:- आपण आपला विषय अधिक लोकप्रिय होण्यासाठी व त्यांच्यातील आधुनिकता जाणून घेण्यासाठी प्रयत्नशील आहात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.१९ वरुन खालील बाबी लक्षात आल्या.

१) याच्या पूर्वी सांगितल्या प्रमाणे सर्वच विषय शिक्षकांना आपल्या विषयाबद्दल प्रेम व अभिमान असतो. आपल्या विषयाबद्दल औपचारिक रित्या किंवा अनौपचारिक रित्या जे काही प्राप्त होईल ते स्वीकारण्यास तो कधीही तयार असतो.

मागच्या कोष्टकात विषयाच्या प्रबोधनाबद्दल प्रश्न विचारलेला होता त्याच्याशी संलग्नीत हा प्रश्न आहे. तेंव्हा सर्वच शिक्षकांनी या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. त्यांची संख्या ५० आहे व शेकडा प्रमाणात त्यांची स्थिती १००% अशी होईल. कोणत्याही प्रतिसादकाने या प्रश्नास 'नाही' असे उत्तर दिले नाही. तेंव्हा आपल्या विषयाच्या आधुनिक ज्ञानाबद्दल जागृत राहणे ही विकासासाठी गुरुकिल्ली आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.२०:-

घटक-१५:- आपल्या संस्थेत खालील पैकी कोणत्या भागातील विद्यार्थ्यांचा जास्त समावेश आहे?

| अ.क्र. | प्रतिसाद ( पर्याय ) | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | शहरी | २५ | ५० % |
| २ | ग्रामीण | १० | २० % |
| ३ | दोन्हीही | १५ | ३० % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२० वरुन खालील बाबी आढळल्या.

१) खरे संशोधन हे सोलापूर शहरापूरते मर्यादित आहे. तरीही संशोधकाने खात्री करुन घेण्यासाठी वरील प्रश्न विचारला व त्याचे उत्तर विविध प्रकारे आले. शाळा शहराच्या कोणत्या भागात आहे याच्यावरुन त्याच्या मध्ये प्रतिसाद मिळाला आहे.

२) आमची शाळा शहरी प्रकारामध्ये येते व या ठिकाणी शहरातील विद्यार्थी जास्त आहेत अशा एकूण २५ शाळा आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण हे ५० होते.

३) आमची शाळा ग्रामीण प्रकारामध्ये मोडते या ठिकाणी ग्रामीण विद्यार्थ्यांची जास्त संख्या आहे असे प्रतिसाद देणा-या कमी शाळा आहेत त्यांची संख्या १० आहे व त्याचे शेकडा प्रमाण २० एवढे आहे.

४) आमची शाळा शहर व ग्रामीण या दोन्हीही प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांनी भरलेली आहे असे प्रतिसादात्मक उत्तर देणा-या शाळांची संख्या ही १५ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ३० होते.

वरील तिन्हीही बाबीवरुन असे आढळते की, शाळा शहरामध्ये असून देखील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाकडे मोठा ओढा आहे. तसे पाहता शहरातील संख्या जास्त असणे उघड आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.२१:-

घटक-१६:- आपल्या संस्थेत व्यावसायिक विषयाच्या प्रशिक्षणासाठी मुलींचा समावेश होतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४० | ८० % |
| २ | नाही | १० | २० % |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२१ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) आपली शाळा मुलींना व्यावसायिक व तांत्रिक विषयाचे प्रशिक्षण देते का? या प्रश्नाला चांगले उत्तर मिळाले. याच्या पूर्वीच्या एका कोष्टकात स्त्रियांबद्दल असाच एक प्रश्न होता. त्या प्रश्नाशी मिळता जुळता हा प्रश्न आहे. तेव्हां 'होय' असे प्रतिसादात्मक उत्तर देणा-या शिक्षकांची संख्या ४० आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ८० होते व हे प्रमाण खरोखरच चांगले आहे.

'नाही' असे उत्तर देणा-या शिक्षकांची संख्या १० आहे व त्यांचे शेकडा प्रमाण २० होते व ते फार कमी आहे.

या वरुन असे लक्षात येते की, मुलींनी या क्षेत्रात बरीच प्रगती केलेली आहे. कारण असे म्हणतात ना, एक स्त्री शिकली म्हणजे संपूर्ण घार शिकते. आणि घार शिकले म्हणजे देश शिकतो. या प्रमाणे बाकीच्या संस्थांनी देखील मुलींसाठी तांत्रिक व व्यावसायिक विषयाच्या प्रशिक्षणाची सोय करावी व देशाच्या प्रगतीला/विकासाला हातभार लावावा.

-:कोष्टक क्र. ४.२.२२:-

घटक-१७:- आपल्या संस्थेत मुलींसाठी आणखी नवीन व्यवसायिक विषय सुरु करण्याची योजना आखली आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | ४० % |
| २ | नाही | ३० | ६० % |
| | एकूण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२२ वरुन खालील बाबी स्पष्ट होतात.

१) मुलींसाठी ब-याच शाळांमधून तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण पूर्वी पासून चालू आहे. परंतु दिवसेंदिवस होत असलेली प्रगती पाहता जुने अभ्यासक्रम काळाच्या ओघात सामान्य वाटू लागलेले आहेत. त्यामुळे नवीन अभ्यासक्रम हाती घेतल्यास मुलींसाठी आणखी काही नवीन व्यवसायाची संधी प्राप्त होईल.

या ठिकाणी कोष्टकात विचारलेल्या प्रश्नास 'नाही' म्हणून प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ३० आहे. त्याचे शेकडा प्रमाण ६० होते. हे प्रमाण तुलनेने अधिक आहे.

प्रश्नावलीस 'होय' म्हणून प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या २० आहे. त्याचे शेकडा प्रमाण ४० होते. हे प्रमाण कमी आहे.

तेंव्हा शाळेने तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी नव-नवीन अभ्यासक्रम समाविष्ठ करुन घ्यावेत. त्यामुळे शाळेचा , विद्यार्थ्यांचा व देशाचा फायदा होईल. अनेक मुलींच्या कलागुणांना वाव मिळेल.

-:कोष्टक क्र. ४.२.२३:-
घटक-१८:- व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी-निवडी नुसार व्यावसायिक प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळालेला आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४७ | ९४ % |
| २ | नाही | ०३ | ०६ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२३ वरुन खालील बाबीं आढळल्या.

१) शक्यतो सर्वच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी निवडी नुसार तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम मिळत नाही असे विद्यार्थी दुस-याच विषयात पदवी संपादन करतात. तेव्हां त्या विषयाबद्दल त्यांना फार गोडी नसते . फक्त काम चलावू पदवी म्हणून ते त्या विषयाकडे पाहतात.

सदर प्रश्नास 'होय' असे प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ४७ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ९४ होते हे प्रमाण अतिशय जास्त आहे.

तसेच सदर प्रश्नास 'नाही' असा प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ही ३ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ६ होते. हे प्रमाण अत्यल्प आहे.

तेंव्हा विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांचा आवडीचा विषय कोणता हे लक्षात ठेवून त्या विषयामध्ये त्याला प्रवेश दयावा तरच त्या विषयामध्ये तो रस घेईल व आपल्याला पाहिजे तसे कौशल्य तो संपादित करेल. परंतु सध्या स्पर्धेचे जग असल्यामुळे गुणवत्तेनुसार सदर आवडीच्या विषयांना प्रवेश दिला जातो.

-:कोष्टक क्र. ४.२.२४:-

घटक-१९:- आपण अध्यापन करीत असलेल्या व्यावसायिक विषयांच्या प्रशिक्षणासाठी विद्यार्थी उत्साही आहेत का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| | एकूण............ | ५० | १०० % |

वरील कोष्टकावरुन खालील बाबी आढळल्या.

१) शिक्षकांचा स्वतःचा अध्यापन विषय असल्यामुळे त्या विषयाबाबत गोडी असणे साहजिक आहे. तेंव्हा आपला विषय कोठे कमी पडू नये म्हणून शिखक धडपडत असतात. अगदी जीवापलीकडे या विषयाला ते जपतात. आपल्या विषयाबद्दल कोणतेही अपप्रचार ते सहन करीत नाही. तेव्हां स्वतःच्या विषयाला विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी अतिशय धडपडत असतात असे त्यांचे मत असते.

सदर प्रश्नास 'होय' असे प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ५० आहे. त्याचे शेकडा प्रमाण १०० होते. व हे प्रमाण सर्वोच्च आहे.

'नाही' असे उत्तर देणारा शिक्षक एकही आढळला नाही.

-:कोष्टक क्र. ४.२.२५:-

घटक-२०:- आपण अध्यापन करीत असलेल्या व्यावसायिक विषयाचे विदयार्थी प्रशिक्षणानंतर कोणत्या मार्गाकडे जाण्याचा त्यांचा कल असतो?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | ३३ | ६६ % |
| २ | उदयोग | १७ | ३४ % |
| | एकूण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२५ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) तांत्रिक व व्यावसायिक शाळांत अध्यापन करीत असलेल्या शिक्षकांनी सदर प्रश्नास चांगला प्रतिसाद दिला आहे. तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विदयार्थी नोकरी करतात असे प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ३३ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ६६ होते व हे प्रमाण जास्त आहे.

२) तसेच तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विदयार्थी उदयोगाकडे वळतात असे प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या १७ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ३४ होते व हे प्रमाण तसे पाहता कमी आहे.

याचा अर्थ असा की, प्रशिक्षणानंतर आपल्या स्वतःच्या उदयोगाकडे वळणारे विदयार्थी कमी आहेत व अनेक विदयार्थ्यांना नोकरीची आवड आहे. असे विदयार्थी विविध कारखान्यात व इतर व्याक्सायिक विषयाशी संबंधीत ठिकाणी आपली उपजिविका करतात.

-:कोष्टक क्र. ४.२.२६:-

घटक-२२:- व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी आपल्याकडे वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०४ | ०८ % |
| २ | नाही | ४६ | ९२ % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२६ वरुन खालील बाबी लक्षात आल्या.

१) सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देणा-या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सोय उपलब्ध 'नाही' असे म्हणणा-या प्रतिसादकांची संख्या ४६ व त्याचे शेकडा प्रमाण ९२% आहे. हे प्रमाण अतिशय जास्त आहे.

तसेच सदर प्रश्नास 'होय' असा प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ४ आहे त्याचे शेकडा प्रमाण ८ होते हे प्रमाण अत्यल्प आहे.

यावरुन असे आढळते की, सोलापूर परिसरातून येणा-या इतर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणासाठी मोठया प्रमाणात खर्च करावा लागतो. परगांवच्या विद्यार्थ्यांना जरी या तांत्रिक व व्यावसायिक विषयाची आवड असली तरी मोठ्या खर्चा अभावी ही मुले या शिक्षणापासून वंचित राहतात. फक्त ज्या विद्यार्थ्यांची ऐपत आहे तेच विद्यार्थी परगांवहून ये-जा करुन हे प्रशिक्षण पूर्ण करतात.

या प्रमाणे सोलापूरातील एकूण तांत्रिक व व्यावसायिक शाळापैकी काही शाळांनी वसतीगृहाची सोय करावी जेणे करून फक्त परगांवच्या विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी राहण्याची सोय उपलब्ध होईल. व आपले प्रशिक्षण अगदी चांगल्या प्रकारे पूर्ण करु शकतील.

-:कोष्टक क्र. ४.२.२७:-

घटक-२३:- आपण व्यक्तिशः शाळाबाहय उपक्रमात विद्यार्थ्यांना समाविष्ठ करून घेता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४१ | ८२ % |
| २ | नाही | ०९ | १८ % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२७ वरून खालील बाबी आढळल्या.

१) विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमा व्यतिरिक्त आणखी ब-याच गोष्टी अवगत असणे गरजेचे असते. शाळेमध्ये विषय शिक्षकांनी आपल्या विषयाबद्दल नाविण्य पूर्ण उपक्रम राबविणे आवश्यक आहे. ते उपक्रम कोणतेही असोत बौद्धिक अथवा शारिरीक.

या प्रकारे विद्यार्थ्यांना शालेय उपक्रमात अगदी मोठ्या प्रमाणात सहभागी करावे व त्यानंतर त्या उपक्रमाची त्याला पूर्ण जाणीव झाल्यास शाळाबाहय उपक्रमांसाठी त्याची निवड करावी. आपल्या विषयाला अनुसरून या उपक्रमात त्याला सहभागी होण्यास प्रोत्साहन दयावे. उदा- प्रदर्शन, शिबीर व व्याख्याने इत्यादी.

वरील कोष्टकात शाळाबाहय उपक्रमात समाविष्ठ करण्याबाबत 'होय' असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या ४१ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ८२ होते. हे प्रमाण खरोखरच अतिशय जास्त आहे. यामुळे विदयार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यास मदत होते.

तसेच सदर प्रश्नास 'नाही' उत्तर देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ९ आहे त्याचे शेकडा प्रमाण १८ होते. हे प्रमाण फारच कमी आहे. तेव्हां उर्वरित शिक्षकांनी देखील वरील शिक्षकांचा आदर्श घेऊन विदयार्थ्यांना शालेय तसेच शालाबाहय उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहन दयावे.

तांत्रिक व व्यावसायिक शाळांनी एकत्रित येऊन दिवाळी , पावसाळी व उन्हाळी अशा मोसमवजा स्पर्धेचे आयोजन करून विदयार्थ्यांना कृतिशील, बुद्धीशील व शारिरीक दृष्टया मजबूत होण्यासाठी प्रयत्न करावेत.

-:कोष्टक क्र. ४.२.२८:-

घटक-२४:- आपल्या संस्थेतील विदयार्थी राज्य/राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या स्पर्धेमध्ये सहभागी झालेले आहेत का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४३ | ८६ % |
| २ | नाही | ०७ | १४ % |
| | एकूण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२८ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) संस्थेतील खेळाडू राज्य किंवा राष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेत का? या प्रश्नास ब-याच शिक्षक प्रतिसादकांनी 'होय' असे उत्तर दिले आहे. 'होय' असे उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ४३ आहे व त्यांचे शेकडा प्रमाण ८६ होते आणि हे प्रमाण अतिशय जास्त आहे.

'नाही' असे उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ही अत्यंत कमी आहे. केवळ ७ प्रतिसादकांनी नाही असे उत्तर दिले आहे. त्याचे शेकडा प्रमाण १४ होते . हे प्रमाण तुलनेने अत्यंत कमी आहे.

यावरुन असे सिद्ध होते की, पुष्कळ शाळांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी प्राप्त करुन दिलेले आहे. कारण राज्य व राष्ट्रीय स्तर हे शाळेसाठी मानांकित असतात. त्या स्तरावरुन शाळेचा स्तर ओळखला जातो. आणि तांत्रिक व व्यावसायिक कौशल्यासमवेत - खेळामध्ये प्राविण्य असेल तर अशा मुलांना भविष्यात नोकरीची हमखास संधी असते. त्यामुळे आपली मुले (विद्यार्थी) राज्य व राष्ट्रीय याच्या पलिकडे आंतरराष्ट्रीय स्तरापर्यन्त पोहचतील याच्यासाठी प्रयत्न करावा व त्यांना मार्गदर्शन करावे शेवटी विद्यार्थ्यांवरुन शिक्षक ओळखला जातो व शिक्षकावरुन शाळा.

-:कोष्टक क्र. ४.२.२९:-

घटक-२५:- आपण दरवर्षी विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ५० % |
| २ | नाही | २५ | ५० % |
| | एकूण............ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.२९ वरुन खालील बाबी लक्षात आल्या.

१) सहलीबद्दल विचारलेल्या प्रश्नास २५ शिक्षक प्रतिसादकांनी 'होय' असे उत्तर दिले. त्याचे शेकडा प्रमाण ५० होते. हे प्रमाण तुलनेने सम प्रमाणात आहे.

२) त्याच्या उलट 'नाही' असे उत्तर देणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या २५ आहे त्याचे शेकडा प्रमाण ५० होते. हे प्रमाण देखील समप्रमाणात आहे.

यावरुन असे दिसून येते की, सहलीबद्दल विचारलेल्या प्रश्नास ५०% प्रतिसादकांनी 'होय' म्हटलेले आहे व ५०% प्रतिसादकांनी 'नाही' असे म्हटलेले आहे.

विद्यार्थ्यांच्या सहली काढणे आवश्यक असते. त्यामुळे त्यांना परिसराचा चांगला अभ्यास करता येतो. या सहली शैक्षणिक स्वरुपाच्या असाव्यात. विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढण्यास व पर्यटन म्हणून त्याचा आनंद घेता येतो. शिक्षकांनी एकत्रित येऊन वर्षातून एखादया सहलीचे आयोजन करावे. विद्यार्थ्यांबरोबर आपण त्याचा आनंद घ्यावा. महाराष्ट्र शासन परिवहन खात्याने त्या प्रकारच्या सोयी, सवलती दिल्या आहेत. या संधीचा फायदा घेऊन अगदी सवलतीच्या दरात विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढावी.

-:कोष्टक क्र. ४.२.३०:-

घटक-२६:- आपल्या संस्थेत प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना फि भरावी लागते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३५ | ७० % |
| २ | नाही | १५ | ३० % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.३० वरुन खालील बाबी आढळल्या.

१) आपल्या संस्थेमधील प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना फि भरावी लागते का? या प्रश्नास 'होय' म्हणणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ३५ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ७० होते. हे प्रमाण जास्त आहे.

सदर प्रश्नास 'नाही' उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या १५ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ३० होते. व हे प्रमाण तुलनेने फारच कमी आहे.

यावरुन असे निदर्शनास येते की, जवळजवळ सर्वच शाळांत विद्यार्थ्यांकडून फि घेतली जाते. शासनाकडून विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी अनुदान मिळत असून देखील काही संस्था विद्यार्थ्यांकडून फि घेतात. म्हणजे प्रवेश घेतल्यावर विद्यार्थ्याला आपल्या प्रशिक्षणासाठी फि भरावी लागते व या फिचे प्रमाण सर्व ठिकाणी सारखे नाही. संस्थेच्या नियमाप्रमाणे सदर विद्यार्थ्यांना फि भरावी लागते. म्हणजेच या तांत्रिक व व्यावसायिक शाळांत ज्या विद्यार्थ्यांमध्ये फि भरण्याची क्षमता आहे तेच या प्रकारचे प्रशिक्षण घेऊ शकतात. या ठिकाणी सर्वच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकत नाही.

-:कोष्टक क्र. ४.२.३१:-

घटक-२७:- संस्थेमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन मिळते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.३१ वरुन खालील बाबी स्पष्ट होतात.

१) संस्थेमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन मिळते का? या प्रश्नास सर्वच शिक्षक प्रतिसादकांनी 'होय' असे उत्तर दिले आहे. त्यांची संख्या ५० आहे. व याचे शेकडा प्रमाण १००% होते. व हे प्रमाण सर्वोच्च आहे. तेव्हां सर्वच शाळांत विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर भावी जीवनात कोणत्या प्रकारचा मार्ग शोधावा असे सदर सर्वच संस्थात विद्यार्थ्यांना याचे मार्गदर्शन मिळते.

'नाही' उत्तर देणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या शून्य आहे. म्हणजेच ही बाब चांगली आहे. विद्यार्थ्यांना इतर कोणत्याही घटकांकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनापेक्षा शाळेतून आपल्याच गुरुकडून मिळणारे मार्गदर्शन हे सर्वश्रेष्ठ व बिनचूक असते. कारण सदर शिक्षकास विद्यार्थ्यांचा स्तर माहित असतो. त्याच्या क्षमतेप्रमाणे त्या विद्यार्थ्याने पुढे काय करावे हे मोजक्या व

अगदी थोडक्यात हे शिक्षक सांगू शकतात. कारण या शिक्षकांच्या हाताखालून असे बरेच मार्गदर्शन झालेले असते. सदयःस्थितीचा विचार करून व अनुभवाच्या जोरावर हे शिक्षक विद्यार्थ्यांनी भावी जीवनात नेमके काय करावे याचा सल्ला देतात.

-ःकोष्टक क्र. ४.२.३२ः-

घटक-२८ः- आपण विद्यार्थ्यांना भावी जीवनात नोकरी करावयास सांगणार की स्वतःचा उदयोग?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | ०६ | १२ % |
| २ | उदयोग | ४४ | ८८ % |
| | एकूण............ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.३२ वरून खालील बाबीं आढळल्या.

१) शिक्षकांना विचारलेल्या आपण विद्यार्थ्यांना भावी जीवनात नोकरी करावयास सांगणार की स्वतःचा उदयोग या प्रश्नास 'उदयोग' म्हणून प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ४४ आहे व त्यांचे शेकडा प्रमाण ८८% होते. तेव्हां हे प्रमाण सर्वोच्च आहे.

'नोकरी' म्हणून प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ६ आहे व याचे शेकडा प्रमाण १२% होते. हे प्रमाण अत्यंत कमी आहे.

या दोन्ही गोष्टी नोकरी आणि उदद्योग यांची तुलना केली असता शिक्षकांनी 'उदद्योग' असा कौल दिला आहे. या शिक्षकांस माहित आहे त्यांनी त्यांच्या विदयार्थ्यांना उदद्योग करण्यास सक्षम बनविले आहे. उगाचच नोकरीच्या मागे लागून वेळा वाया न घालविता सुरुवातीला प्राथमिक स्वरुपात आपला स्वतःचा कुटीर उदद्योग सुरु करावा व भविष्यात एखादया चांगल्या नोकरीची संधी चालून आल्यास सदर उदद्योग आणि नोकरी यामध्ये जो उत्तम फायदा देणारा आहे त्यामध्ये अगदी विचार करुन स्वतःला झोकून दयावे.

याठिकाणी शिक्षकांस उदद्योगावर विश्वास आहे. तेव्हां विदयार्थ्यांनी शिक्षकांचे मार्गदर्शन घेऊनच हे पाऊल उचलावयाचे आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.३३:-

घटक-२९:- आपल्या संस्थेत व्यावसायिक तत्वावर विदयार्थ्यांकडून वस्तु तयार करुन घेतल्या जातात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३३ | ६६ % |
| २ | नाही | १७ | ३४ % |
| | एकूण............ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.३३ वरुन खालील बाबी स्पष्ट झाल्या.

१) आपल्या संस्थेत व्यावसायिक तत्वावर विद्यार्थ्यांकडून वस्तु तयार करुन घेतल्या जातात का? या प्रश्नास 'होय' उत्तर देणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ३३ आहे व त्याचे प्रमाण शेकडा ६६% होते व हे प्रमाण जास्त आहे.

'नाही' असे उत्तर देणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या १७ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ३४% होते हे प्रमाण कमी आहे.

या दोन्ही प्रतिसादकांची तुलना करता 'होय' म्हणणाऱ्यांची संख्या जास्त आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासमवेत अशा व्यावसायिक स्वरुपात वस्तु तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे. या मुळे विद्यार्थ्यांना आपल्या वस्तुंची किंमत समजेल. आपण तयार केलेल्या वस्तु बाजार पेठेत टिकतात का नाही व त्या वस्तुंमध्ये आणखी कोणत्या प्रकारची सुधारणा करावी तसेच ग्राहकांकडून कोणत्या प्रकारच्या वस्तुंची मागणी जास्त आहे ते समजेल. वस्तुंची विक्री कशी करावी, लिलाव कसा असतो, वस्तु किरकोळ भावात विकावी की ठोक भावात विकावी याचे ज्ञान आत्मसात होते.

इतर संस्थांनी देखील आपल्या शाळेत या प्रकारचा उपक्रम हाती घ्यावा व मिळणाऱ्या अनुदानातून कच्चा माल आणून मोठ्या प्रमाणात पक्का माल बनविण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे. या प्रशिक्षणातूनच प्रत्येक विद्यार्थी तावून सुलाखून निघण्यास मदत होईल. नंतर पुढे त्याच्या भावी जीवनात शिक्षकांच्या इच्छेप्रमाणे त्याला प्रशिक्षणानंतर ताबडतोब प्राथमिक स्वरुपात आपला लघु उद्योग सुरु करण्यास चालना मिळेल.

-:कोष्टक क्र. ४.२.३४:-

घटक-३०:- आपण आपल्या विषयातील सखोल माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी परिसरातील तज्ज्ञ मंडळींचे सहकार्य घेता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण........... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.३४ वरुन खालील बाबी आढळतात.

१) आपण आपल्या विषयातील सखोल माहिती विद्यार्थ्यांना होण्यासाठी परिसरातील तज्ज्ञ मंडळींचे सहकार्य घेता का? या प्रश्नास 'होय' उत्तर देणारे सर्वच शिक्षक प्रतिसादक आढळले. यांची एकूण संख्या ५० आहे. त्यांचे शेकडा प्रमाण १०० होते. हे प्रमाण सर्वोच्च आहे.

'नाही' असे उत्तर देणारे कोणीच नाही. म्हणजेच सर्वच शिक्षकांना आपल्या विषयाच्या प्रशिक्षणाबाबत आवड आहे. विद्यार्थ्यांना फक्त प्रशिक्षण देऊन शिक्षक थांबले नाहीत त्यांनी या प्रशिक्षणा व्यतिरिक्त उपक्रमाचा देखील समावेश केला आहे. समाजातील असे निरनिराळे उदद्योजक व त्यांनी शून्यातून केलेली प्रगती याची माहिती विद्यार्थ्यांना होणे गरजेचे असते. या यशस्वी उदद्योजकांकडून मिळालेली माहिती प्रेरणादायी ठरु शकते. व आपल्या विषयाचा पुढे कोण कोणत्या उदद्योगासाठी उपयोग होणार

आहे व त्यासाठी आपणास आणखी काय करावे लागणार हे समजते. माहिती सांगण्यास आलेल्या उद्योजकास निरनिराळे प्रश्न विचारुन आपल्या शंकेचे निरसन करता येते व उदयोग समुहाला प्रत्यक्ष भेट देऊन व त्या ठिकाणी चालणा-या कार्याची प्रत्यक्ष माहिती मिळते.

-:कोष्टक क्र. ४.२.३५:-

घटक-३१:- आपल्या संस्थेतील व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेल्या विदयार्थी बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आलेला आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४१ | ८२ % |
| २ | नाही | ०९ | १८ % |
| | एकूण............ | ५० | १०० % |

कोष्टक क्रमांक ४.२.३५ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) आपल्या संस्थेतील व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेला विदयार्थी बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आलेला आहे काय? या प्रश्नास 'होय' म्हणून उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ४१ आहे याचे शेकडा प्रमाण ८२% होते. हे प्रमाण जास्त आहे.

'नाही' असे उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ९ आहे व याचे शेकडा प्रमाण १८% आहे. हे प्रमाण अत्यंत अल्प आहे.

या दोन्ही प्रतिसादकांची तुलना करता बराच विरोधाभास आढळतो. तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबर इतर विषयावरही लक्ष केंद्रीत करुन बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आपल्या विद्यार्थ्याला आणणे ही मोठी गर्वाची बाब आहे. सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक शाळांचे या प्रकारचे यश पाहून खरोखरच आनंद वाटतो. या वरुन नक्कीच असे आढळते की, सोलापूरचा शिक्षक हा खरोखरच तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण अगदी तन्मयतेने देत आहेत. अशा प्रकारे गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी सोबत तांत्रिक व व्यावसायिक विषयांचे कौशल्य संपादन केलेले पुढे नक्कीच अभियांत्रिकी क्षेत्रात चमकणार व भारतासारख्या देशाला विकसित करणार.

इतर उर्वरित संस्थांनी देखील आपला एखादा तरी विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलाच पाहिजे असा निश्चय करुन त्या दिशेने वाटचाल करावी.

-:कोष्टक क्र. ४.२.३६:-
घटक-३२:- आपण आपल्या संस्थेत पालक शिक्षक सभा आयोजित करता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............... | ५० | १०० % |

कोष्टक क्रमांक ४.२.३६ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) पालक-शिक्षक सभा आयोजित करता का? या प्रश्नास 'होय' म्हणून प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ५० व त्याचे शेकडा प्रमाण १००% होते. हे प्रमाण सर्वोच्च आहे.

'नाही' असा प्रतिसाद देणारा एकही शिक्षक आढळला नाही. म्हणजे याचे शेकडा प्रमाण शून्य आहे. तेव्हां सोलापूर शहरातील सगळ्याच तांत्रिक व व्यावसायिक शाळांत पालक शिक्षक सभेचे आयोजन होते.

पालक-शिक्षक सभेचे शालेय स्तरावर आयोजन करणे ही चांगली गोष्ट आहे. या सभेला पालकांचा प्रतिसाद असणे गरजेचे आहे. या ठिकाणी सभेमध्ये चर्चा पद्धतीचा अवलंब असावा. पालकांना थेट शिक्षकांशी संपर्क साधून आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घेता येतो. व एक पालक म्हणून घरामध्ये कोणत्या प्रकारचे शैक्षणिक वातावरण आवश्यक आहे याची माहिती घेता येते. आपल्या पाल्याचे गुण व दोष कळल्यामुळे पालकांना त्या पद्धतीने पाल्याकडे लक्ष देता येते. काही शाळांमध्ये पालक - शिक्षक संघाची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील सोयीस्कर दिवस ठरवून या सभेचे आयोजन करता येते. या ठिकाणी पाल्याला हजर राहण्यास मनाई असते.

-:कोष्टक क्र. ४.२.३७:-

घटक-३३:- आपल्या अध्यापनाबाबत व प्रशिक्षणाबाबत पालक समाधानी आहेत का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............. | ५० | १०० % |

कोष्टक क्रमांक ४.२.३७ करुन असे लक्षात आले.

१) शिक्षकांना विचारलेल्या अध्यापन व प्रशिक्षणाबाबतच्या प्रश्नास सर्वच शिक्षकांनी 'होय' असा प्रतिसाद दिलेला आहे. या शिक्षकांची संख्या ५० आहे व त्याचे शेकडा प्रमाण १०० होते. हे प्रमाण खरोखरच सर्वोच्च आहे.

'नाही' म्हणणाऱ्या एकही शिक्षक आढळला नाही. त्याचे शेकडा प्रमाण शून्य आहे.

या प्रश्नाच्या आधी असे अनेक प्रश्न विचारलेले आहेत. त्या प्रश्नास शिक्षकांचा होय म्हणूनच प्रतिसाद आला आहे. याच्या आधी पाहिल्याप्रमाणे सर्वच शिक्षकांना आपल्या विषयाचा अभिमान असतो. आपल्या प्रशिक्षणावर व अध्यापनावर त्यांचा विश्वास असतो. या क्षेत्राची आवड असल्यामुळे ते नक्कीच परिणामकारक ठरतात. आपला विषय कोणत्याही प्रकारे लोकप्रिय व्हावा असे त्यांना वाटत असते. अनुभवातून होणाऱ्या चूका दुरुस्त करुन अगदी चांगल्या प्रकारचे दर्जेदार शिक्षणाचा पुरवठा करण्याचा मानस असतो. म्हणून आपल्या अध्यापनाबाबत पालकांपेक्षा विद्यार्थ्यांकडे पोच पावती असते असे त्यांचे ठाम मत आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.३८:-

घटक-३४:- आपण संस्थेमध्ये राबवित असलेल्या विविध नवोपक्रमांना पालकांकडून प्रतिसाद मिळतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४७ | ९४ % |
| २ | नाही | ०३ | ०६ % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.३८ यावरुन खालील बाबी आढळतात.

१) शिक्षक आपल्या विषयाच्या अधिक माहितीसाठी विविध उपक्रम राबवित असतात. उपक्रम म्हटल्यास पैशाची आवश्यकता असते. तेव्हां सदर नवोपक्रम शाळेमध्ये किंवा शाळेबाहेर राबवित असता या उपक्रमामध्ये आपल्या पाल्याने सहभागी व्हावे असे प्रत्येक पालकाला वाटते का? या विचारलेल्या प्रश्नास 'होय' म्हणून प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ४७ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ९४ होते. हे प्रमाण अतिशय जास्त आहे.

'नाही' असे उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ०३ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ०६ होते. हे प्रमाण अत्यंत कमी आहे.

यावरुन असे लक्षात येते की, पालकांचा शिक्षकांवर मोठा विश्वास आहे. शिक्षक जे काही उपक्रम राबवितात त्यामध्ये आपल्या पाल्याचा फायदा आहे व हे उप्रकम संबंधीत विषयाशी निगडीत असतात. त्यामुळे पालकांचा या उपक्रमास पूर्णपणे पाठींबा असणे आवश्यक आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.३९:-

घटक-३५:- एखादया क्रोधीत पालकांने आपल्या विरुद्ध प्राचार्याकडे किंवा पोलिसात तक्रार केलेली आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | — | — |
| २ | नाही | ५० | १०० % |
| | एकूण............. | ५० | १०० % |

कोष्टक क्रमांक ४.२.३९ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) शाळा म्हटल्यास या शाळेच्या संबंधीत सर्व घटक आलेच. एखादया वेळेस फीसाठी किंवा अनुपस्थितीवरुन वर्ग शिक्षक आणि पालक यांच्यात तक्रार होते. विदयार्थी जर सतत सांगून देखील अधून मधून गैरहजर राहण्याचा क्रम चालूच ठेवतो. तेव्हां शिक्षकांना नाईलाजास्तव पालकांना बोलावून घ्यावे लागते व या सततच्या पालकांच्या बोलावणीबद्दल काही पालकांना आपल्याकामामध्ये किंवा नोकरीमध्ये अडथळे होऊ लागतात व इकडे शाळेमध्ये विदयार्थ्यांना पालकांला आणल्याशिवाय वर्गात बसावयाचे नाही याचा तगादा चालू असतो. तेव्हां पालक आपले काम आहे त्या ठिकाणी ठेवून शिक्षकाच्या भेटीस येतात व बोलण्याच्या ओघात नको ते शब्द पालक बोलून जातात व ही तक्रार प्राचार्याकडे जाते. कधी कधी पोलीसांत तक्रार देखील नोंदविली जाते व हे नैसर्गिक आहे.

सदर विचारलेल्या प्रश्नास 'नाही' असे उत्तर देणा-या शिक्षकांची संख्या ५० आहे व त्याचे शेकडा प्रमाण १०० होते. हे प्रमाण सर्वोच्च आहे.

'होय' म्हणणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या शून्य आहे. या ठिकाणी शिक्षकांनी पालक सभा घेतल्यामुळे किंवा पालकांच्या सतत भेटी मुळे आपले वर्षभराचे कार्यक्रम निश्चित करुन सांगितलेले आहेत. पालकांच्या प्रतिसादामुळेच शालेय उपक्रम किंवा शाळेची शिस्त कायम राहत असते. पालक आणि शिक्षक यांना एकमेकांची माहिती असेल तर असे प्रसंग ओढावत नाहीत. शिक्षकांना संबंधीत विदयार्थी व पालकांची परिस्थिती याची माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यानुसार विदयार्थ्यांना शिस्त लावण्यात लवचिकता प्राप्त होते.

-:कोष्टक क्र. ४.२.४०:-

घटक-३६:- आपल्या संस्थेसभोवतालचा परिसर अध्ययन अध्यापन कार्य व्यवस्थित चालण्यासाठी पोषक आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ७४ % |
| २ | नाही | १३ | २६ % |
| | एकुण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४० वरुन खालील बाबी आढळल्या.

१) शाळा व इतर सर्व प्रशिक्षण संस्था या नेहमी शहराच्या व गांवाच्या झागमगीपासून , गजबजीपासून दूर असतात. त्या ठिकाणी शिक्षकांच्या अध्यापनाचे विदयार्थी लक्ष केंद्रीत करून अध्ययन करीत असतात. परंतु आता विदयार्थी आणि पालक यांच्या सोईसाठी शाळा त्यांच्या घरापासून अगदी जवळ सुरु असलेल्या दिसतात. त्याठिकाणी अध्यापन व अध्ययनाचा विचार होत नाही. फक्त शाळा जवळ आहे, इमारत मोठी आहे, वर्ग प्रशस्त आहेत फि पुष्कळ आहे, म्हणजे शाळा चांगली आहे असे आता सुत्र झाले आहे. परंतु त्याठिकाणी शिक्षण कोणत्या प्रकारे व कसे दिले जाते व आपल्या विदयार्थ्याला शाळेची गोडी निर्माण होते का? त्याच्या प्रगतीमध्ये विकास झाला आहे का? या सर्व गोष्टी पाहणे महत्वाचे आहे.

या ठिकाणी शिक्षकांना परिसराबाबत विचारलेल्या प्रश्नास ३७ शिक्षक प्रतिसादकांनी 'होय' असे उत्तर दिले आहे त्याचे शेकडा प्रमाण ७४ होते. हे प्रमाण जास्त आहे.

'नाही' असे उत्तर देणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या १३ आहे. त्याचे शेकडा प्रमाण २६ होते हे प्रमाण कमी आहे.

-ःकोष्टक क्र. ४.२.४१ः-

घटक-३७ः- आपली संस्था सर्व आवश्यक भौतिक सुविधांनी संपन्न आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४१ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) आपली संस्था सर्व आवश्यक भौतिक सुविधांनी संपन्न आहे का? या विचारलेल्या प्रश्नास 'होय' असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या ५० आहे व त्याचे शेकडा प्रमाण १०० होते. हे प्रमाण सर्वोच्च आहे.

'नाही' असे उत्तर देणाऱ्या शिक्षकांची संख्या शून्य आहे. जवळजवळ सर्वच शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. कारण शाळा सर्व भौतिक सुविधांनी संपन्न असणे महत्वाचे आहे. त्या भौतिक सुविधा म्हणजे उदा- प्रसाधन कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रशस्त वर्ग, प्रयोग शाळा, ग्रंथालय, प्रांगण, फळा, बेंच, आणि इतर साहित्य उपलब्ध असणे.

वरील सोई शाळांमध्ये असणे अत्यावश्यक आहे. यातील काही शाळा सोडून बाकीच्या सर्व शाळांमध्ये या सोयी उपलब्ध आहेत.

-:कोष्टक क्र. ४.२.४२:-

घटक-३८:- आपल्या संस्थेमध्ये होणाऱ्या वार्षिक तपासणी बद्दल आपण समाधानी आहात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४५ | ९० % |
| २ | नाही | ०५ | १० % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४२ वरुन खालील बाबी स्पष्ट झाल्या.

१) संस्थेमध्ये होणा-या वार्षिक तपासणी बद्दल विचारलेल्या प्रश्नास ४५ शिक्षकांनी 'होय' असा प्रतिसाद दिला आहे. त्याचे शेकडा प्रमाण ९० आहे. हे प्रमाण जास्त आहे.

'नाही' असा प्रतिसाद देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ५ आहे व त्याचे शेकडा प्रमाण १० होते. हे प्रमाण अत्यल्प आहे.

वरील दोन्ही प्रतिसादाचा विचार केल्यास शाळेमध्ये होणा-या वार्षिक तपासणीबद्दल पुष्कळ शिक्षक समाधानी आहेत. याचा अर्थ असा की, शाळांची तपासणी चिकित्सक होते व शिक्षकांच्या प्रत्येक बाबींची तपासणी होते. त्यांच्या अडी-अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

खरोखरच शाळेच्या वार्षिक तपासणी वेळेस बारीक - सारीक गोष्टींची तपासणी होणे आवश्यक असते. त्यामधून आपणांस चुकलेल्या गोष्टी सुधारण्याची संधी मिळते. आपल्या त्रुटी दूर करण्यास मदत होते. सदयःस्थिती मध्ये शाळांची संख्या अफाट झालेली आहे. त्यामुळे शाळेपर्यन्त एखादा अधिकारी पोहचणे हे दुर्मिळ झाले आहे. काहीही असले तरी शालेय तपासणी होणे गरजेचे असते.

-:कोष्टक क्र. ४.२.४३:-

घटक-३९:- आपल्या संस्थेत सर्व व्यावसायिक विषयांकडे संस्थेकडून सारख्या दृष्टिकोनातून लक्ष दिले जाते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ५० % |
| २ | नाही | २५ | ५० % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४३ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) तांत्रिक व व्यावसायिक विषय शालेय पातळीवर राबवित असता त्या विषयामध्ये पुष्कळ प्रमाणात विविधता आढळते. यामधील काही विषयांना अधिक महत्व असते. तसेच त्या विषयाला विद्यार्थी आणि पालक यांच्या कडून मोठ्या प्रमाणात मागणी असते. या कारणांमुळेच सदर विषयाला अधिक महत्व प्राप्त होते. विषयाला महत्व प्राप्त होणे म्हणजेच त्या शिक्षकाला व त्या शाळेला प्रसिद्धी मिळणे. उदा. मेकॅनिकल या विषयाला सर्वच विद्यार्थ्यांनी अर्ज केला तर त्यांना प्रवेश मिळणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना आधीच्या परीक्षेत जास्त गुण आहेत त्यांनाच सदर विषयास प्रवेश मिळू शकेल. म्हणजेच साहजिकच या विषयाला महत्त्व प्राप्त झाले.

इतर माध्यमिक शाळांमध्ये गणित व इंगजी या विषयाला जास्त महत्व दिले जाते व या विषयांचे जादा तास ठेवण्यात येतात. उन्हाळ्याच्या आणि दिवाळीच्या सुट्टीत या विषयाचा सराव करुन घेतला जातो. या विषयाबद्दल जेवढी पुस्तके उपलब्ध होतील तेवढी पुस्तके खरेदी करण्यास संस्था तयार असते व परीक्षा संपल्यानंतर त्या परीक्षेत गणित आणि इंग्रजी या विषयाला पडलेल्या गुणांची पडताळणी होते. त्यानुसार विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश दिला जातो.

या प्रमाणेच तांत्रिक व व्यावसायिक शाळांत असे काही व्यावसायिक विषय आहेत की, त्या विषयाला वार्षिक खर्च हा इतर विषयापेक्षा दुप्पटीने अधिक असतो. त्या विषयाचे साहित्य खरेदी मोठ्या प्रमाणात असते व बाकीच्या विषयाबद्दल एखादया साहित्याची मागणी केली असता ते साहित्य

लवकर उपलब्ध होत नाही. या व इतर अनेक कारणांमुळे विषय शिक्षकांत गैर समजुतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. आणि आपल्याच विषयाला असे का? हा प्रश्न उभा राहतो.

संस्थेकडून सर्व विषयाला सारखे लक्ष दिले जाते का या प्रश्नाला 'होय' प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या २५ आहे त्याचे शेकडा प्रमाण ५०% होते व हे प्रमाण सम आहे.

तसेच 'नाही' असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या २५ आहे त्याचे शेकडा प्रमाण ५० होते.

यावरुन असे आढळते की, संस्थेकडून काही विषयांना अधिक महत्व प्राप्त करुन दिले जाते.

-:कोष्टक क्र. ४.२.४४:-

घटक-४०:- व्यावसायिक व तांत्रिक विषयाचे प्रशिक्षण देण्यासाठी आपल्याकडे पुरेशी इमारत आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४२ | ८४ % |
| २ | नाही | ०८ | १६ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४४ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) व्यावसायिक व तांत्रिक विषयाचे प्रशिक्षण देण्यासाठी मोठ्या कार्यशाळेची आवश्यकता असते. कार्यशाळेमध्ये फक्त प्रात्यक्षिक कामाचा अभ्यास झाला पाहिजे. तसेच विषयाप्रमाणे कार्यशाळेचे नियोजन आवश्यक आहे.

थेअरी साठी वर्ग खोल्यांची गरज असते. थेअरी व प्रात्यक्षिक यांची सांगड घालून वेळापत्रक तयार झाले पाहिजे. प्रशस्त कार्यशाळेशिवाय प्रशिक्षण अपूर्ण असते. प्रशस्त व सर्व साहित्यानी सुसज्ज असलेल्या प्रयोग शाळेत प्रात्यक्षिक काम दर्जेदार होण्यास मदत होते.

याठिकाणी तांत्रिक व व्यावसायिक विषयाला संबंधित इमारतीवर विचारलेल्या प्रश्नास 'होय' प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या ४२ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ८४ होते हे प्रमाण अतिशय जास्त आहे.

'नाही' म्हणणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ०८ आहे व त्याचे शेकडा प्रमाण १६ होते. हे प्रमाण अत्यंत कमी आहे. यावरुन असे दिसते की, सोलापूर शहरातील पुष्कळ शाळेमध्ये प्रशिक्षणासाठी खास इमारतीची सोय आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.४५:-

घटक-४१:- आपल्या कडे 'कमवा आणि शिका' ही शिक्षण योजना आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | — | — |
| २ | नाही | ५० | १०० % |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४५ वरुन खालील बाबी आढळल्या

१) सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांत 'कमवा आणि शिका' ही शिक्षण पद्धती आढळत नाही. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी फार वर्षापूर्वी ही पद्धत गरीब विद्यार्थ्यांसाठी तसेच काही इच्छूक विद्यार्थ्यांसाठी तयार केली होती. याच धरतीवर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांकडे आर्थिक तरतुद नाही अशा विद्यार्थ्यांना शेती वजा कामे करुन, मेहनत करुन त्या शेतीतून विविध पिकांचे उत्पादन काढून आपले शिक्षण पूर्ण करण्याची सोय आहे. या प्रकल्पावर विद्यापीठाचे पूर्ण नियंत्रण असते. विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली विद्यार्थ्यांकडून सर्व शेतीवजा कामे करुन घेतली जातात. त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना वसतीगृहात राहून स्वयंसेवा पद्धतीने भोजन तयार करुन उपजीविका करावी लागते. ही पद्धत गरीब विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयोगाची आहे.

फक्त शेती हाच विषय निवडावा असे नाही. तर समाजोपयोगी कोणत्याही वस्तूंचे उत्पादन काढून, वस्तु तयार करुन 'कमवा आणि शिका' ही पद्धत आपल्या शाळेत सुरु करु शकतो.

'कमवा आणि शिका' या प्रश्नास 'नाही' असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ५० आहे त्याचे शेकडा प्रमाण १०० होते. व हे प्रमाण सर्वोच्च आहे.

'होय' असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची संख्या शून्य आहे. तेव्हां संपूर्ण सोलापूरात एकाही शाळेत या प्रकारची योजना नाही. शाळांनी या प्रकारची 'कमवा आणि शिका' योजना आपल्याकडे सुरु करून गरीब वंचित मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यास हरकत नाही.

-:कोष्टक क्र. ४.२.४६:-

घटक-४२:- आपल्या विषयाच्या प्रात्यक्षिक कामाच्या प्रशिक्षणासाठी आठवड्यातील तासिका पुरेशा आहेत का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०९ | १८ % |
| २ | नाही | ४१ | ८२ % |
| | एकूण.............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४६ करून खालील बाबी आढळल्या.

१) कोणत्याही तांत्रिक व व्यावसायिक विषयाच्या प्रात्यक्षिक कामासाठी पुष्कळ वेळ लागणे हे साहजिकच आहे. एखादे काम व्यवस्थित होण्यासाठी त्या कामाला वेळ देणे गरजेचे असते. तेव्हां त्याच्या मधून चांगला घटक निर्माण होतो. घाई-गडबडीत केलेल्या कामामुळे पाहिजे तसे परिणाम प्राप्त होत नाहीत.

तांत्रिक आणि व्यावसायिक शाळांत प्रात्यक्षिक कामावर जास्त भर असतो. यामुळे विदयार्थ्यांना आपल्या विषयामध्ये कौशल्य प्राप्त करता येते. या कौशल्याच्या आधारावर त्याला पुढे भावी जीवनात आपला व्यवसाय उभा करावा लागतो. परंतु ब-याच शाळेमध्ये प्रात्यक्षिक कामासाठी दिलेला वेळ हा अत्यंत कमी आहे. यावेळेमध्ये अभ्यासक्रमाप्रमाणे प्रत्येक घटकाचे प्रात्यक्षिक काम पूर्ण करण्यास अत्यंत घाई होते. तेव्हां वेळ तरी वाढवावा किंवा अभ्यासक्रम तरी कमी करावा अशी शिक्षकांची इच्छा आहे.

सदर वेळेबद्दल विचारलेल्या प्रश्नास 'नाही' असा प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ४१ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ८२ होते व हे प्रमाण अत्यंत जास्त आहे.

'होय' म्हणणा-या शिक्षकांची संख्या ९ आहे. त्याचे शेकडा प्रमाण १८ होते. हे प्रमाण अत्यंत कमी आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.४७:-

घटक-४३:- प्रशिक्षणातील निर्मित वस्तुंची विक्री व्यवस्था आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०९ | १८ % |
| २ | नाही | ४१ | ८२ % |
| | एकूण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४७ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) प्रशिक्षणातील निर्मित वस्तुंची विक्री व्यवस्था आहे का? या प्रश्नास 'नाही' म्हणणा-या प्रतिसादक शिक्षकांची संख्या जास्त आहे. त्यांची एकूण संख्या ४१ आहे व शेकडा प्रमाण ८२ होते.

'होय' म्हणणा-या शिक्षक प्रतिसादक शिक्षकांची संख्या कमी आहे. त्यांची एकूण संख्या ९ आहे व शेकडा प्रमाण १८ होते.

तांत्रिक व व्यावसायिक शाळा या प्रात्यक्षिक कामावर जास्त भर देत असतात तेव्हां या प्रशिक्षणातून अनेक छोटया-मोठया वस्तु दरवर्षी विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतल्या जातात. या वस्तु शाळेमधील एखादया अडगळीच्या खोलीत पडून राहण्याऐवजी त्यांची कौशल्यपूर्ण रितीने विल्हेवाट लावावी. म्हणजेच त्या वस्तु कमी दरामध्ये गावातील लोकांना विकाव्यात व संस्थेला त्याचा फायदा करून दयावा.

सुतारकाम, लोहार काम, पत्रे कारागीर व इलेक्ट्रीक इत्यादी तांत्रिक विषयामधून मोठया प्रमाणात वस्तु तयार होतात. विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणानंतर त्या वस्तु सदर विद्यार्थ्यांना किंवा स्थानिक नागरीकांना कमी भावाने विकाव्यात.

-:कोष्टक क्र. ४.२.४८:-

घटक-४४:- आपल्या संस्थेत टाकावू वस्तु पासून टिकावू वस्तु तयार करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना दिले जाते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४५ | ९० % |
| २ | नाही | ०५ | १० % |
| | एकूण............ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४८ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) संस्थेत टाकावू वस्तु पासून टिकावू वस्तु तयार करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना दिले जाते का? या प्रश्नास 'होय' म्हणून उत्तर देणा-या शिक्षक प्रतिसादकांची संख्या ४५ आहे. याचे शेकडा प्रमाण ९० होते व हे प्रमाण अतिशय जास्त आहे.

'नाही' म्हणून प्रतिसाद देणा-या शिक्षकांची संख्या ५ आहे. त्याचे शेकडा प्रमाण १० होते.

यावरुन असे लक्षात येते की, सोलापूर शहरातील जवळजवळ सर्वच तांत्रिक व व्यावसायिक शाळांत 'टाकावू वस्तुपासून टिकावू वस्तु' बनविण्याचे प्रशिक्षण देतात. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना अगदी कमी खर्चामध्ये एखादी वस्तु तयार करुन घेता येते.

विद्यार्थ्यांना याची सवय शालेय जीवनापासूनच लावता येते. शाळेतील एखादे साहित्य उदा- टेबल, खुर्ची, बेंच, फळा, इलेक्ट्रीक बोर्ड, दरवाजे, खिडक्या इत्यादी तुटलेले असल्यास त्याची दुरुस्ती कोणत्या प्रकारे करावी . त्यासाठी कोण-कोणत्या हत्यारांची आवश्यकता आहे. ती हत्यारे कशी वापरावी याचे ज्ञान या प्रशिक्षणातून दिले जाते. समाजामधील नागरीकांच्या घरांना भेटी देऊन प्रायोगिक तत्वावर दारे व खिडक्या दुरुस्त करुन दयाव्यात यामुळे आपल्या ज्ञानात भर पडते. एखादया खुर्चीचा किंवा टेबलाचा पाय तुटला असेल तर तो कसा दुरुस्त करावा त्यासाठी कोणते कौशल्य वापरावे याची प्राथमिक माहिती विदयार्थ्यांना होणे आवश्यक आहे. नादुरुस्त गाडी चा कोणता भाग गेलेला आहे हे नेमके ओळखता यावे. गाडी खोलून पुन्हा आहे तशी जोडण्याचे प्रशिक्षण विदयार्थ्यांना मिळावे.

इत्यादी टाकावू वस्तुपासून टिकावू वस्तु तयार करण्याचे कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून व्हावे.

-:कोष्टक क्र. ४.२.४९:-

घटक-४५:- आपण आपल्या विषयाच्या अध्यापनासाठी पाठ्य पुस्तका व्यतिरिक्त इतर बाह्य पुस्तकांचा (संदर्भ ग्रंथ ) किंवा इतर बाह्य साधने/साहित्यांचा वापर करता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ५० % |
| २ | नाही | २५ | ५० % |
| | | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.४९ वरुन खालील बाबी आढळल्या.

१) शिक्षकांना विचारलेल्या इतर बाह्य पुस्तकांबद्दल व साहित्य/साधनाच्या वापराबद्दल २५ शिक्षक प्रतिसादकांनी होकारात्मक प्रतिसाद दिला आहे. व २५ शिक्षक प्रतिसादकांनी नकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्याचे शेकडा प्रमाण ५० होते.

म्हणजेच ५० टक्के शिक्षक प्रतिसादक आपला विषय अधिक परिणामकारक व्हावा व विद्यार्थ्यांना सदर विषयाबद्दल गोडी प्राप्त व्हावी व सर्वांग्णि कौशल्य प्राप्त होण्यासाठी होकारात्मक प्रतिसाद देणारे शिक्षण बाह्य पुस्तकांचा व साहित्यांचा वापर सतत आपल्या अध्यापन वजा प्रशिक्षण कार्यात करीत असतात.

इतर ५०% शिक्षकांनी देखील आपल्या इतर होकारात्मक प्रतिसाद देणाऱ्या सहकारी शिक्षकांप्रमाणे इतर बाह्य साहित्य साधनांचा व पुस्तकांचा वापर करावा परंतु प्रथम आपले पाठ्यपुस्तक परिणामकारकपणे शिकविणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

-:कोष्टक क्र. ४.२.५०:-

घटक-४६:- आपल्या संस्थेमध्ये प्रशिक्षणास पुरक असे सर्व साहित्य/साधने उपलब्ध आहेत का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २१ | ४२ % |
| २ | नाही | २९ | ५८ % |
| | एकूण............. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.२.५० वरुन खालील बाबी लक्षात आल्या.

१) सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक संस्थेत सदर विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांत प्रशिक्षणास पुरक साहित्य/साधने कमी प्रमाणात उपलब्ध आहेत.

शिक्षक प्रतिसादकांना विचारलेल्या सदर प्रश्नास २९ शिक्षकांनी नकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ५८ होते व २१ शिक्षकांनी होकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्याचे शेकडा प्रमाण ४२ होते.

यावरुन असे दिसते की, शिक्षकांना अध्यापन व प्रात्यक्षिक कार्य करताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. काही प्रात्यक्षिक कार्य साहित्याविना पूर्ण करावे लागते असा प्रतिसाद काही शिक्षक देतात.

-:कोष्टक क्र.४.२.५१:-

घटक-४७:- संस्थेमध्ये उपलब्ध असलेले प्रशिक्षणास पुरक साहित्य / साधने विद्यार्थ्यांना वर्षभर हाताळण्यासाठी संधी मिळते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४५ | ९० % |
| २ | नाही | ०५ | १० % |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्र. ४.२.५१ यावरुन खालील बाबी आढळल्या.

१) सोलापूर शहरातील जवळजवळ सर्वच तांत्रिक/व्यावसायिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांत उपलब्ध असलेले शैक्षणिक साहित्य/साधने विद्यार्थ्यांना वर्षभर प्रात्यक्षिक कामासाठी हाताळण्याची संधी मिळते.

४५ शिक्षक प्रतिसादकांनी सदर शैक्षणिक साहित्य/साधने विद्यार्थ्यांना हाताळण्याची संधी मिळते असा होकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांचे शेकडा प्रमाण ९० होते व हे प्रमाण जास्त आहे.

तसेच ५ शिक्षकांनी सदर प्रश्नास नकारात्मक प्रतिसाद दिला आहे. व त्यांचे शेकडा प्रमाण १० होते. या १०% शिक्षकांनी देखील आपल्या संस्थेमध्ये जे काही उपलब्ध साहित्य/साधने आहेत ते सर्व प्रात्यक्षिक कार्याच्या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त कालावधीपर्यन्त सदर साहित्य हाताळण्याची संधी दयावी.

## ४.३ मुलाखतीव्दारे मिळालेल्या संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनः-

संशोधकाने मुलाखतीसाठी तांत्रिक व व्यावसायिक विभागाशी संबंधित तीन माध्यमांची निवड केलेली आहे. या तीन माध्यमांची नावे खालील प्रमाणे—

१. प्राचार्य/ पर्यवेक्षक
२. विदयार्थी / प्रशिक्षणार्थी
३. पालक (तांत्रिक व व्यावसायिक विभागाशी संबंधित विदयार्थ्यांचे पालक)

१) संशोधकाने पहिल्या मुलाखतीसाठी तांत्रिक व व्यावसायिक विषयाशी संबंधित १० प्राचार्य / पर्यवेक्षकांची निवड केलेली आहे. यामध्ये सोलापूर शहरातील सर्व तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा समावेश आहे. या संस्थांमधील या प्रमुखांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली आहे. एकूण १४ तांत्रिक व व्यावसायिक संस्थांपैकी ७ संस्थांचा या ठिकाणी समावेश झाला आहे.

२) दुसरी मुलाखत विदयार्थी (प्रशिक्षणार्थी) वर्गाची आहे. तांत्रिक व व्यावसायिक विभागांमध्ये सदर कौशल्याचे अध्ययन करणाऱ्या विदयार्थ्यांचा या ठिकाणी समावेश झाला आहे. सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या सर्व संस्थापैकी काही संस्थांची यादृच्छिक पद्धतीने निवड करून प्रत्येक संस्थे मधील ४ ते ५ विदयार्थ्यांची निवड सदर मुलाखतीसाठी केलेली आहे.

३) पालकः- तिसरी मुलाखत पालकांची आहे. यामध्ये तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांच्या पालकांचा समावेश आहे. सदर पालकांची तांत्रिक व व्यावसायिक विभाग व आपला पाल्य यांच्या विषयी मत जाणून घेण्यासाठी मुलाखत घेतलेली आहे. या पालकांची देखील शाळांप्रमाणे यादृच्छिक पद्धतीचा अवलंब करून मुलाखत घेतली आहे. या मुलाखतीव्दारे पाल्य व तांत्रिक शाळा यांची सदयःस्थितीचा अभ्यास केला आहे.

**मुलाखत भाग-१ः**

- **प्राचार्य / मुख्याध्यापक / पर्यवेक्षक यांच्या मुलाखतीः-**

सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक विभागाशी संबंधित प्रमुखांच्या मुलाखती घेण्यासाठी प्रथम सदर संस्थांची यादृच्छिक पद्धतीने निवड केली त्यानंतर या १० प्रमुखांच्या वैयक्तिक मुलाखती घेण्यात आल्या.

या मुलाखती घेतलेल्या प्रतिसादकांची यादी परिशिष्ठ क्र.५ मध्ये दिलेली आहे. त्यामध्ये प्रतिसादकांचे संपूर्ण नाव, हुद्दा, शैक्षणिक अर्हता, अध्यापनाचा विषय, व संस्थेचा पत्ता दिला आहे.

तसेच संस्थेची इमारत, ग्रंथालय कामकाजातील अडचणी, शिक्षकांविषयी मत, भौतिक सुविधा व इतर अनेक प्राथमिक स्वरुपाचे प्रश्न विचारण्यात आलेले आहे.

या सर्व मुदद्यांची माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाने एकूण ३० प्रश्न विचारले आहेत. यामध्ये बंदिस्त व मुक्त प्रश्नांचा देखील समावेश आहे. या ३० प्रश्नापैकी २० प्रश्नांची निवड विश्लेषण व अर्थनिर्वचनासाठी केली आहे. संशोधकाने या एकूण २० प्रश्नांची अनुसूची तयार केलेली आहे व ती परिशिष्ठ मध्ये दिली आहे. त्याचे विश्लेषण व अर्थ निर्वचन कोष्टक क्रमांक ४.३.१ पासून पुढे दिले आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.१:-

घटक क्रमांक-१:- आपणांस अध्यापनाच्या तासिका आहेत का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहेत | ०६ | ६० % |
| २ | नाहीत | ०४ | ४० % |
| | एकूण............ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१ वरून असे दिसून येते की, सदर प्रमुखांस अध्यापनाच्या तासिका बद्दल विचारलेल्या प्रश्नास आहेत. असा प्रतिसाद देणाऱ्या प्रमुखांची संख्या ६ आहे. त्याचे शेकडा प्रमाण ६० होते.

'नाही' म्हणणाऱ्या प्रतिसादक प्रमुखांची संख्या ४ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ४० होते.

या ठिकाणी अध्यापन करणाऱ्या तांत्रिक व व्यावसायिक विभाग प्रमुखांची संख्या जास्त आहे. शहरातील अध्यापन करणाऱ्या प्रमुखांची संख्या अधिक आहे. त्यामुळे इतर शिक्षक कर्मचाऱ्यांना हे एक प्रोत्साहनपर उदाहरण आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.२:-

घाटक-२:- आपल्या या संस्थेस स्वतःची स्वतंत्र इमारत आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहे | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............. | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.२ वरुन असे दिसून येते की, स्वतंत्र इमारत आहे असा प्रतिसाद १००% प्रतिसादकांनी नोंदविला आहे.

म्हणजेच सोलापूर शहरातील सर्वच तांत्रिक व व्यावसायिक विभाग आप-आपल्या स्वतंत्र इमारतीमध्ये विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे दर्जेदार प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आहेत. ही विकासाची व गर्वाची बाब आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.३:-

घाटक-३:- तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देण्यासाठी ही इमारत पुरेशी आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण................ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.३ वरुन असे दिसून येते की, तांत्रिक व व्यावसायिक विषयाच्या प्रशिक्षणासाठी असलेली इमारत पुरेशी आहे असा १०० टक्के प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला आहे.

-:कोष्टक क्र.४.३.४:-

घाटक-४:- सदर संस्थेसाठी स्वतंत्र प्रांगण आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहे | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............... | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.४ वरुन असे दिसून येते की, तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना पुरेसे प्रांगण आहे. असा प्रतिसाद १००% प्रतिसादकांनी दिला आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.५:-

घाटक-५:- आपल्या संस्थेत ग्रंथालय आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | आहे | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............. | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.५ वरुन असे आढळून येते की, तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांसाठी ग्रंथालय आहे असा प्रतिसाद १००% प्रतिसादकांनी नोंदविला आहे.

सर्व तांत्रिक व व्यावसायिक विषयांची भरपूर पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच हि संस्था ज्या शाळेशी व महाविद्यालयाशी संलग्न आहे त्या महाविद्यालयातील ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग विद्यार्थ्यांना करता येतो.

-:कोष्टक क्र. ४.३.६:-

घटक-६:- शिक्षकांना भेटावयाचे झाल्यास वर्गावर जाऊन भेटता की बोलावून घेता?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | भेटतो | ०५ | ५० % |
| २ | बोलावितो | ०५ | ५० % |
| | एकूण................ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.६ वरुन असे दिसून येते की, शिक्षकांना भेटण्यासाठी ५०% प्रमुख संबंधित शिक्षकांच्या विभागामध्ये जावून भेटतात. तर ५० टक्के प्रमुख प्रतिसादक शिक्षकांना बोलावून घेतात.

वरील दोन्हीही गोष्टी चांगल्या आहेत. प्रत्यक्ष शिक्षकांना जावून भेटणे व केबीन मध्ये बोलावून घेणे हे प्रमुखांच्या वैयक्तिक पातळीवरचा प्रश्न आहे. तरी देखील या प्रश्नास ५०-५० प्रतिसाद मिळाला आहे.

-:कोष्टक क्र.४.३.७:-

घटक-७:- संस्थेतील प्रत्येक अध्यापक व त्याचा विषय ( तांत्रिक / व्यावसायिक ) माहित आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............... | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.७ वरुन असे लक्षात येते की, सर्वच प्रमुखांना आपल्या संस्थेतील एकूण शिक्षक व त्यांचा विषय, मग तो तांत्रिक का व्यावसायिक? माहित आहे. असा प्रतिसाद १००% प्रतिसादकांनी दिला आहे.

सर्वच संस्था प्रमुख आपल्या कामामध्ये दक्ष आहेत असा निष्कर्ष निघातो.

-:कोष्टक क्र.४.३.८:-

घटक-८:- अध्यापकांच्या समस्यांचे निराकरण वैयक्तिक होते? मिटींग मध्ये होते? वैयक्तिक / मिटींग / दोन्ही प्रकारे

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक | — | — |
| २ | मिटींग | — | — |
| ३ | दोन्ही प्रकारे | १० | १०० % |
| | एकूण................ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.८ वरुन असे आढळून येते की, तांत्रिक व व्यावसायिक विभागातील प्रमुख आपल्या शिक्षकांना भेटण्यासाठी व त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वैयक्तिक व मिटींग या दोन्ही प्रकारांचा अवलंब करतात.

दोन्ही प्रकारांचा अवलंब करतो असे १००% प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.९:-

घटक-९:- अध्यापकांच्या मिटींग ठराविक तारखेला होतात? का प्रासंगिक?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ठराविक तारखेस | — | — |
| २ | प्रासंगिक | १० | १०० % |
| | एकूण................. | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.९ वरुन असे आढळून येते की, तांत्रिक व व्यावसायिक विभागातील सर्वच प्रमुख 'प्रासंगिक' मिटींग घेतात. प्रासंगिक मिटींग घेतो असे १००% प्रतिसादकांनी सांगितले.

प्रसंगानुसार मिटींग घेणे हे योग्य आहे. कारण ज्या-त्या समस्या त्यात्या वेळेस मांडून त्यावर चर्चा करता येते. व कोणाच्या मनामध्ये एखादया गोष्टीबद्दल संशय राहत नाही व गैरसमज घर करुन बसत नाही. त्यांच्या शंकाचे पूर्णपणे निराकरण करण्यास प्रासंगिक मिटींग हा समस्यांवर व एखादया कार्यक्रमाच्या नियोजनासाठी रामबाण उपाय आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.१०:-

घटक-१०:- अध्यापकांच्या मागणीप्रमाणे सर्व शैक्षणिक साधन-सामुग्री उपलब्ध होते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण................ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१० वरुन असे आढळून येते की, तांत्रिक व व्यावसायिक विभागांच्या प्रमुखांनी १००% प्रतिसाद दिला आहे.

अध्यापकांच्या मागणी प्रमाणे सर्व शैक्षणिक साधन सामुग्री त्या संबंधीत शिक्षकांना उपलब्ध करुन दिली जाते व प्रशिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारची आडकाठी येवू देत नाही. तात्काळ आवश्यक साहित्याचा पुरवठा करुन संबंधीत शिक्षकांच्या ताब्यात दिले जाते. दक्ष प्रमुखांच्या कर्तव्य निष्ठेचे हे जागृत उदाहरण या प्रश्नाच्या प्रतिसादावरुन पहावयास मिळते.

-:कोष्टक क्र. ४.३.११:-

घटक-११:- सर्व व्यावसायिक विषयाकडे सारख्या प्रमाणात लक्ष देण्यात येते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............... | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.११ वरुन असे आढळले की, संस्थेमधील सर्व विषयांकडे संस्था प्रमुखांकडून सारख्या प्रमाणात लक्ष देण्यात येते.

'होय' म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या १००% आहे. तेव्हां कोणताही एक विषय प्रमुखांकडून उचलून धरलेला नाही व सर्व खर्च त्याच विषयासाठी केला जातो व बाकीचे विषय खर्चाविना चालत आहेत. म्हणजेच प्रत्येक विषयाकडे त्याच्या आवश्यकतेनुसार सारखे लक्ष पुरविले जाते.

-:कोष्टक क्र. ४.३.१२:-

घटक-१२:- आपण शिक्षकांना इतर विषयाचा अधिक भार दिला आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०३ | ३० % |
| २ | नाही | ०७ | ७० % |
| | एकूण................ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१२ वरुन खालील गोष्टी आढळल्या.

या ठिकाणी प्रमुखांना विचारलेल्या प्रश्नास 'नाही' म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ७ आहे त्याचे शेकडा प्रमाण ७०% आहे व 'होय' म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ३ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ३० आहे.

सोलापूर शहरातील जवळजवळ सर्वच तांत्रिक आणि व्यावसायिक शाळांत सदर विषयाचे प्रशिक्षण देत असलेल्या शिक्षकांना इतर कोणत्याही दुसऱ्या विषयाचा भार दिला नाही असे आढळले.

काही मोजक्या शाळांनी आपल्या शिक्षकांना हा अधिक भार दिला आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.१३:-

घटक-१३:- अध्यापकांना इतर विषयांच्या अधिक भाराचा मोबदला मिळतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०३ | ३० % |
| २ | नाही | ०७ | ७० % |
| | एकूण............. | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१३ वरुन असे दिसून येते की, ज्या संस्थांनी आपल्या शिक्षकांना इतर विषयाचा भार दिला आहे. त्या शिक्षकांना त्यांच्या या कामाबद्दल अनुदान प्राप्त करुन दिले जाते. शिक्षकांना इतर विषयाचा भार दिला आहे असे प्रतिसाद देणाऱ्या प्रमुखांची संख्या ३ आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ३०% म्हणजेच याचाच अर्थ असा की, अधिक भार अधिक मोबदला.

-:कोष्टक क्र. ४.३.१४

घटक-१४:- संपूर्ण प्रात्यक्षिक कामाचा खर्च शासनाकडून मिळतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............. | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१४ वरुन असे लक्षात येते की, सोलापूर शहरातील सर्वच तांत्रिक व व्यावसायिक संस्थांत प्रात्यक्षिक कामावर होणारा खर्च हा शासनाकडून मिळतो.

याठिकाणी सदर प्रश्नास 'होय' असा प्रतिसाद देणाऱ्या प्रमुख प्रतिसादकांची संख्या १००% आहे. म्हणजेच सर्वच तांत्रिक व व्यावसायिक शाळांत प्रशिक्षण अगदी चांगल्या प्रकारे मिळत आहे. याची ही पोहोच पावती आहे.

-:कोष्टक क्र. ४.३.१५:-

घटक-१५:- विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कामातून तयार झालेल्या वस्तुंचा लिलाव होतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
| --- | --- | --- | --- |
| १ | होय | ०९ | ९० % |
| २ | नाही | ०१ | १० % |
| | एकूण............... | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१५ वरुन असे दिसून येते की, प्रात्यक्षिक कामातून तयार झालेल्या तांत्रिक व व्यावसायिक संस्थेतील वस्तुंचा लिलाव होतो का? या प्रश्नास 'होय' म्हणून ९०% प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला आहे. हा प्रतिसाद उत्तम आहे. जवळजवळ सर्वच संस्था प्रमुख आपल्या संस्थेच्या विकासासाठी व प्रगतीसाठी प्रयत्नशील आहेत याचा प्रत्यय येतो.

या लिलावामधून येणारा पैसा संस्थेच्या विकास कामी वापरण्यास उपयोगी पडतो. व संस्थेला देखील आपल्या ठिकाणी चालू असलेल्या तांत्रिक व व्यावसायिक विभागाचा अभिमान वाटतो.

-:कोष्टक क्र. ४.३.१६:-

घाटक-१६:- शिक्षकांना अद्ययावत ज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रबोधन होते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............... | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१६ वरून असे लक्षात येते की, शिक्षकांना बदलत्या परिस्थितीप्रमाणे त्या त्या विषयाचे अद्ययावत ज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रबोधन होते असे १०० % प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला आहे.

तांत्रिक व व्यावसायिक विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व विभाग प्रमुखांनी एकमताने या प्रश्नाला प्रतिसाद दिला आहे. शिक्षकांच्या प्रबोधनामुळे त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडतेच आणि पुढे त्याचा मोठा फायदा प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होतो नाहीतर मराठी म्हणी प्रमाणे स्थिती होईल. 'आढातच नाही तर पोहऱ्यात कोठून येणार'.

-:कोष्टक क्र. ४.३.१७:-

घाटक-१७:- संस्थेमध्ये क्रीडा शिक्षकांची नेमणूक झालेली आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण.............. | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१७ वरुन असे दिसून येते की, सोलापूर शहरातील सर्वच तांत्रिक व व्यावसायिक विभागामध्ये क्रीडा शिक्षकांची नेमणूक झालेले आहे. १००% शाळा प्रमुखांनी सदर प्रश्नास होकारार्थी उत्तर दिले आहे.

विद्यार्थी प्रशिक्षणार्थ्यांसाठी ही उत्तम बाब आहे. बौद्धिक, तांत्रिक आणि शारीरिक असे सर्वांन्गिण शिक्षण मिळण्याची संधी या ठिकाणी प्राप्त होणार आहे व स्वतंत्र क्रीडा शिक्षक असल्यामुळे उत्साही खेळाडूंना त्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत बिनचूक मार्गदर्शन मिळेल.

-:कोष्टक क्र. ४.३.१८:-

घटक-१८:- आपणांस या पदावर काम करीत असता काही अडचणी येतात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०७ | ७० % |
| २ | नाही | ०३ | ३० % |
| | एकूण.............. | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१८ वरुन असे दिसून येते की, सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक शाळांत प्राचार्य/मुख्याध्यापक व पर्यवेक्षक म्हणून काम करीत असता ७०% प्रमुखांना अडचणी येतात असा प्रतिसाद सदर प्रमुखांनी दिला आहे.

कोणत्याही क्षेत्रामध्ये जबाबदारीच्या पदावर आरूढ झालेल्या जवळजवळ सर्वच अधिका-यांना या समस्येला सामोरे जावे लागते. परंतु योग्य सल्ला मसलत व चर्चा यांच्या अनुषंगाने काही अडचणी दूर करण्यास मदत होते. यासाठी प्रमुखांना तत्पर निर्णय क्षमता व तडजोडीचे कौशल्य प्राप्त असणे आवश्यक असते.

-:कोष्टक क्र. ४.३.१९:-

घटक-१९:- भौतिक साहित्याबद्दल काही अडचण जाणवते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०५ | ५० % |
| २ | नाही | ०५ | ५० % |
| | एकूण................ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.१९ वरुन असे दिसून येते की, तांत्रिक व व्यावसायिक संस्थांमध्ये कार्यरत असता इतर अडचणी प्रमाणे काही भौतिक सोयी-सुविधांची चणचण भासते असे ५०% प्रतिसादकांनी प्रश्नास प्रतिसाद दिला आहे.

शासनाकडून सदर गोष्टींची पूर्तता होत नाही व अनुदानाच्या अभावी या गोष्टींची सुधारणा होऊ शकत नाही असे मत काही प्रमुखांनी व्यक्त केले. काही ठिकाणी प्रसाधन कक्ष व सायकल स्टॅण्ड ची अडचण जाणवली.

-:कोष्टक क्र. ४.३.२०:-

घटक-२०:- प्रशासनामध्ये कोणती अडचण येते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०८ | ८० % |
| २ | नाही | ०२ | २० % |
| | एकूण................ | १० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.३.२० वरुन असे आढळते की, काही तांत्रिक व व्यावसायिक शाळा वगळून ७० शाळा प्रमुखांना त्यांच्या प्रशासनामध्ये अडचणी येतात.

याचा अर्थ असा की, खुर्ची जेवढी चांगली तेवढया अडचणी असतात. मराठीतील म्हणी प्रमाणे 'दुरुन डोंगर साजरे' - जो पर्यन्त आपण त्या खुर्चीच्या जवळ जात नाही तो पर्यन्त त्या खुर्चीचे महत्व आपणांस समजत नाही. अधिका-यांच्या अशा खुर्च्या म्हणजे समस्या व अडचणी सोडविण्याचे एक मोठे भांडार असते. प्रशासनातील अशा पुष्कळ अडचणी प्रमुखांच्या दैनंदिन कामकाजामध्ये उद्‌भवत असतात. परंतु कौशल्याच्या व अनुभवाच्या जोरावर सदर प्रमुख यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करीत असतात. शेवटी कोणताही अधिकारी किंवा प्रमुख त्यांच्या प्रशासकीय कौशल्यावरुन ओळखला जातो.

## ४.४ मुलाखत भाग दोनः-

तांत्रिक व व्यावसायिक विभागामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या १४ शैक्षणिक संस्थांमधील १० शाळांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली. या १० शाळांमधील प्रत्येकी ५ प्रशिक्षणार्थ्यांची मुलाखतीसाठी निवड करून या विभागाबद्दलची त्यांची मते जाणून घेण्यात आली आहेत. या ५० प्रशिक्षणार्थ्यांच्या वैयक्तिक मुलाखतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढील कोष्टकात केलेले आहे.

### - विदयार्थ्यांच्या मुलाखतीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनः-

-ःकोष्टक क्र. ४.४.१ः-

घाटक -१ः- तुम्ही घेत असलेल्या प्रशिक्षण विषयासंबंधीत साधन सामुग्री तुमच्या कडे उपलब्ध आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३२ | ६४ % |
| २ | नाही | १८ | ३६ % |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.१ वरून असे लक्षात येते की, प्रशिक्षणार्थी प्रतिसादकांनी 'आपल्या जवळ साधन सामुग्री उपलब्ध आहे का?' या प्रश्नास चांगला प्रतिसाद दिला आहे. जवळ जवळ सर्वच विदयार्थ्यांजवळ साहित्य आहे असे यावरून लक्षात येते. 'होय' असा प्रतिसाद देणारे ६४ % प्रतिसादक आहेत.

विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाच्या आवडी नुसार आता पासूनच एक एक साहित्य संकलित करावे व छोटी मोठी कामे हाती घेऊन अनुभवी कलाकाराच्या मदतीने संबंधीत कामे प्रयत्नपूर्वक पूर्ण करण्याचा मानस करावा.

-:कोष्टक क्र. ४.४.२

घटक-२:- तांत्रिक शाळेमध्ये आवडीने प्रवेश घेतला? का कोणी सुचविले?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्वतःचा निर्णय | ४३ | ८६ % |
| २ | दुसऱ्यांनी सुचविले | ०७ | १४ % |
| | | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.२ वरून असे लक्षात येते की, तांत्रिक व व्यावसायिक विभागामध्ये प्रशिक्षण घेत असलेले जवळजवळ सर्वच विद्यार्थी आपल्या स्वतःच्या आवडीने या क्षेत्रात आलेले आहेत. सदर प्रश्नास स्वतःचा निर्णय असे प्रतिसाद देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४३ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ८६ आहे.

कोणत्याही क्षेत्रात आवडीने प्रवेश करून सदर क्षेत्राचा अभ्यास करणे हे बहुधा हिताचे असते.

-:कोष्टक क्र. ४.४.३:-

घाटक-३:- पहिल्या शाळेमध्ये आणि या शाळेमध्ये काही फरक वाटतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.३ वरुन असे लक्षात येते की, विद्यार्थ्यांना विचारलेल्या या प्रश्नास १००% प्रतिसादकांनी 'होय' असे उत्तर दिले आहे. याचा अर्थ असा की, सोलापूर शहरातील सर्वच तांत्रिक व व्यावसायिक शाळांनी इतर माध्यमिक शाळांच्या तुलनेने काहीतरी वेगळे याठिकाणी असते असा प्रत्यय दिला आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनापेक्षा काही तरी नवीन त्याच्या आवडी नुसार अनुभव देणे यातच खरे शैक्षणिक कौशल्य आहे.

-:कोष्टक क्र. ४.४.४

घाटक-४:- या तांत्रिक / व्यावसायिक शाळेमध्ये फी भरावी लागते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १५ | ३० % |
| २ | नाही | ३५ | ७० % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.४ वरुन असे लक्षात येते की, तांत्रिक व व्यावसायिक विभागामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या ७०% विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी फी भरावी लागत नाही.

विद्यार्थ्यांना या महागाईच्या युगात देखील शासन संस्थेच्या माध्यमातून कसल्याही प्रकारची फी न घेता अगदी मोफत प्रशिक्षण देते. या संधीचा लाभ पुष्कळ विद्यार्थ्यांनी घेणे आवश्यक आहे. याच्या पाठीमागे शासनाच काहीतरी ध्येय असावे या ध्येयाच्या पूर्तीसाठी आपण मोठया प्रमाणात अगदी कौशल्यपूर्वक प्रशिक्षण पूर्ण करुन शासनाचे स्वप्न साकार केले पाहिजे.

-:कोष्टक क्र. ४.४.५:-

घटक-५:- प्रात्यक्षिक कामासाठी लागणा-या कच्च्या मालाचा पुरवठा संस्था करते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.५ वरुन असे लक्षात येते की, वर्षभरामध्ये जे काही प्रात्यक्षिक काम विद्यार्थ्यांकडून पूर्ण करुन घ्यावयाचे आहे त्या प्रात्यक्षिक कामसाठी लागणा-या कच्च्या मालाच्या पुरवठा शासनामार्फत संस्था करते असा प्रतिसाद १००% विद्यार्थ्यांनी दिला आहे.

म्हणजेच संस्थेमध्ये प्रवेश केल्यावर विद्यार्थ्यांना कसल्याही प्रकारची फी भरावी लागत नाही. अगदी कमी खर्चात पुष्कळ ज्ञान आत्मसात करण्याचे हे तांत्रिक व व्यावसायिक विभाग एक स्त्रोत आहे.

-:कोष्टक क्र. ४.४.६

घटक-६:- प्रात्यक्षिक कामातून तयार झालेल्या वस्तु संस्थेमध्ये ठेवता? का घरी घेऊन जाता?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | संस्थेमध्ये ठेवतो | ५० | १०० % |
| २ | घरी घेऊन जातो | — | — |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.६ वरुन असे लक्षात येते की, विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कामामधून तयार झालेल्या वस्तु विद्यार्थ्यांना संस्थेमध्येच ठेवाव्या लागतात. असा प्रतिसाद १००% प्रतिसादकांनी नोंदविला आहे.

कच्च्या मालासाठी शासन संस्थेच्या माध्यमातून पैसा पुरवठा करीत असल्यामुळे कच्च्या मालापासून तयार केलेल्या पक्कया वस्तु संस्था ताब्यात घेवून त्यांची नोंद ठेवते व वर्षाच्या शेवटी त्या अनुदानाचा व प्रशिक्षणातून निर्माण झालेल्या वस्तुंचा ताळेबंद ठेवावा लागतो.

-:कोष्टक क्र. ४.४.७:-

घटक-७:- संस्थेमध्ये होणाऱ्या प्रात्यक्षिक कामाबद्दल तुम्ही समाधानी आहात?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.७ वरुन असे लक्षात येते की, शहरातील सर्वच तांत्रिक व व्यावसायिक शाळांत विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण हे समाधानकारक आहे असे १००% प्रतिसादकांनी प्रतिसाद नोंदविला आहेत.

म्हणजेच विद्यार्थ्यांना मिळणारे प्रशिक्षण हे दर्जेदार आहे. या प्रशिक्षणाचा सदर विद्यार्थ्यांना नक्कीच भावी जीवनात चांगला उपयोग होणार यात तीळमात्र शंका वाटत नाही.

-:कोष्टक क्र. ४.४.८:-

घटक -८:- तुम्हांला वर्ग अध्ययन आवडते? का प्रात्यक्षिक काम?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | वर्ग अध्ययन | १७ | ३४ % |
| २ | प्रात्यक्षिक कार्य | ३३ | ६६ % |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.८ वरुन असे लक्षात येते की, कार्यशाळेतील प्रात्यक्षिक काम आवडते असा ६६% प्रतिसादकांनी प्रतिसाद दिला आहे. हा प्रतिसाद खरे पाहता चांगला आहे. कारण वर्ग अध्ययनाबद्दल बरेच विद्यार्थी आनंदी नसतात. खास प्रशिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त आपला वेळ प्रात्यक्षिक कार्यावर खर्च करावा असे वाटत असते. व हे कार्य आपणांस त्वरित शिकता यावे याकडे बहुधा त्यांचा कल असतो.

-:कोष्टक क्र. ४.४.९:-

घटक-९:- कार्यशाळेतील प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करण्यासाठी दिलेला वेळ पुरेसा आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५० | १०० % |
| २ | नाही | — | — |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.९ वरुन असे दिसून येते की, विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कामासाठी दिलेला वेळ हा पुरेसा आहे असे १००% प्रतिसादकांनी आपला प्रतिसाद नोंदविला आहे.

म्हणजेच शासनाने व संस्थेने प्रात्यक्षिक कामासाठी ठेवलेला वेळ हा अभ्यासपूर्वक आहे. तांत्रिक व व्यावसायिक शाळांचे हे वेळापत्रक संशोधन पूर्वक तयार केलेले आहे. विद्यार्थ्यांना खरोखरच या विभागामध्ये आपल्या कलागुणांना वाव देण्यास फार मोठी संधी शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे.

-:कोष्टक क्र.४.४.१०

घटक-१०:- तुम्ही घेतलेला तांत्रिक विषय व तुमच्या घरचे वातावरण मिळते जुळते आहे का? (तांत्रिक विषयास पोषक वातावरण)

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ५० % |
| २ | नाही | २५ | ५० % |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.१० वरुन असे दिसून येते की, ५०% प्रतिसादक घरचे वातावरण तांत्रिक विषयाशी पोषक आहे असा प्रतिसाद नोंदवितात हे प्रमाण सम आहे.

म्हणजेच सदर प्रतिसादक घरच्या वातावरणाच्या प्रेरणेमुळे या विषयाचा अभ्यास करीत असावेत व बाकीच्या प्रतिसादकांनी स्वतःच्या इच्छेने सदर विषय निवडून घरामध्ये या व्यावसायाशी मिळते जुळते वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विषयाला जर पोषक वातावरण असेल तर त्या विषयाबद्दल पूर्ण माहिती मिळण्यास मदत होते.

-:कोष्टक क्र. ४.४.११:-

घाटक-११:- शाळेमध्ये येणारे शिक्षक परगावचे जास्त आहेत ? का स्थानिक जास्त आहेत?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | स्थानिक | ५० | १०० % |
| २ | परगाव | — | — |
| | एकूण................ | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.११ वरुन असे दिसून येते की, तांत्रिक व व्यावसायिक शाळांमध्ये अध्यायन करणाऱ्या शिक्षकांची एकूण संख्या पाहता 'स्थानिक ' शिक्षक सदर संस्थांमध्ये पुष्कळ आहेत. १००% प्रतिसादकांनी स्थानिक शिक्षक संख्या जास्त आहे असे उत्तर दिले आहे.

या सर्व तांत्रिक व व्यावसायिक संस्था सोलापूर शहरातील असल्यामुळे साहजिकच ही संख्या अधिक असणे क्रमप्राप्त आहे. स्थानिक शिक्षक असल्यामुळे विद्यार्थ्यांना जास्त फायदा होतो. शिक्षकांच्या रजा कमी भरतात व शाळेला येण्याची व जाण्याची वेळ ही घाई गडबडीची नसते. विद्यार्थ्यांना भरपूर वेळ देवून त्यांच्या कडून उत्तम व पुष्कळ प्रात्यक्षिक कार्य करून घेता येते. शक्यतो स्थानिक नोकरदार असतील तर त्यांना अत्यंत कमी शारीरिक व मानसिक समस्यांना तोंड दयावे लागते.

-:कोष्टक क्र. ४.४.१२:-

घटक-१२:- तुम्ही घेतलेल्या तांत्रिक विषयासंबंधी अधिक माहिती मिळविण्यासाठी जवळपासच्या केंद्रांना भेटी दिल्या आहेत का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २५ | ५० % |
| २ | नाही | २५ | ५० % |
| | एकूण................. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.१२ वरुन असे दिसून येते की, प्रतिसादकांना विचारलेल्या प्रश्नाला ५०% प्रतिसादकांनी होकारार्थी उत्तर दिले आहे. हे प्रमाण सम प्रमाणात आहे.

सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक शाळांनी आपल्या शाळेतील विविध विषयाचे प्रशिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना त्यांच्या विषयाच्या अधिक माहितीसाठी जवळ पासच्या उदयोग समुहाला किंवा अभियांत्रिकी महाविदयालयास भेट देवून त्या ठिकाणी चालू असणाऱ्या उदयोगांची व अभ्यासाची बारकाईने पाहणी करण्यासाठी भेट देणे आवश्यक असते. त्या ठिकाणी सदर उदयोगाचे निरीक्षण करून त्या उदयोग समुहाचा अहवाल तयार करावा. ज्या शाळांनी अशा प्रकारची शैक्षणिक भेट जवळपासच्या केंद्रांना दिली नसेल तर लगेच अशा प्रकारच्या भेटीचे आयोजन करून विदयार्थ्यांना विषयाबाबत अधिक माहिती पूरवा.

-:कोष्टक क्र. ४.४.१३:-

घटक-१३:- व्यावसायिक व तांत्रिक विषयाबद्दल अधिक माहिती सांगण्यासाठी परिसरातील तज्ञ प्रशिक्षक किंवा अधिकारी येतात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०८ | १६ % |
| २ | नाही | ४२ | ८४ % |
| | एकूण.................. | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.१३ वरुन असे दिसून येते की, व्यावसायिक व तांत्रिक शाळांना संबंधीत माहिती पुरविण्यासाठी परिसरातील तज्ञ प्रशिक्षक व अधिकारी येत नाहीत असे ८४% विद्यार्थी प्रतिसादकांनी आपले मत व्यक्त केले आहे.

खरे पाहता तांत्रिक व व्यावसायिक विषयासंबंधीत अनेक उपक्रम राबविता येतात. हे सर्व त्या विषयांच्या शिक्षकांच्या उत्साहावर अवलंबून आहे. काही ठिकाणी शिक्षकांचा उत्साह मोठा असतो परंतु संस्थेकडून त्या प्रकारची परवानगी मिळत नाही. या कारणावरुन विद्यार्थ्यांचे नुकसान होते. जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी, आय.टी.आय. प्राचार्य व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक यांना एखादा विषय देवून मार्गदर्शनपर माहिती सांगण्यासाठी आपल्या संसथेत पाचारण करु शकतो.

-:कोष्टक क्र. ४.४.१४:-

घटक-१४:- आपण भविष्यात नोकरी करणार? का उदद्योग?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | २७ | ५४ % |
| २ | उदद्योग | २३ | ४६ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.४.१४ वरून असे दिसून येते की, भविष्यामध्ये सदर विभागाचे विदद्यार्थी जवळजवळ दोन्ही मार्गाचा अवलंब करतील.

या ठिकाणी विचारलेल्या प्रश्नास ५४% विदद्यार्थ्यांनी 'नोकरी' व ४६% विदद्यार्थ्यांनी 'उदद्योग' असा प्रतिसाद दिला आहे. जवळजवळ हे प्रमाण सम आहे. विदद्यार्थ्यांनी या ठिकाणी या दोन्ही गोष्टींचा सारासार विचार करुन सल्ला मसलत करुन व अभ्यास करुन योग्य तो निर्णय घ्यावा. या साठी अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन व सल्ला महत्त्वाचा आहे. आपल्याजवळ जर आवड , वेळ, चिकाटी आणि पैसा असेल तर सरळ उदद्योगात उतरणे चांगले. परंतु त्या प्रकारचे कौशल्य प्रथम पूर्ण पणे आत्मसात करुन हा निर्णय घेणे आवश्यक आहे. तरच आपणाला 'तिमिरातूनी तेजाकडे' जाण्याची संधी प्राप्त होईल.

## ४.५ मुलाखत भाग -तीनः-

तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे प्रशिक्षण देत असलेल्या १४ शैक्षणिक संस्थांपैकी १० शाळांची निवड यादृच्छिक पद्धतीने करुन सदर १० शाळांमधील प्रत्येकी ५ प्रशिक्षणार्थ्यांच्या पालकांची मुलाखत घेण्यात आली. या पालकांची तांत्रिक व व्यावसायिक विभागाबद्दलची मते जाणून घेण्यात आली. आपला पाल्य, तांत्रिक विभाग व सद्यःस्थिती याचा अभ्यास पालकांच्या वैयक्तिक मुलाखतीव्दारे केला आहे. ५० पालकांच्या वैयक्तिक मुलाखतीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढील कोष्टकांत केलेले आहे.

## ४.५ पालकांच्या मुलाखतीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनः-

-ःकोष्टक क्र. ४.५.१ः-

घटक-१ः- तांत्रिक / व्यावसायिक शाळेमध्ये आपल्या मुलाने प्रवेश घ्यावा असे तुम्हांला कोणी सुचविले ? का स्वतःचा निर्णय आहे ?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सुचविले | २१ | ४२ % |
| २ | स्वतःचा निर्णय | २९ | ५८ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.५.१ वरुन असे दिसून येते की, ५८ % पालकांनी आपल्या पाल्याला स्वतःच्या इच्छेनुसार तांत्रिक व व्यावसायिक विभागांमध्ये प्रवेश घेतला. हे प्रमाण जास्त आहे.

समाजामध्ये राहणा-या मानवाला आपल्या अवती-भोवती घडत असलेल्या गोष्टींची जाणीव होत आहे. त्यामुळे समाजाला सध्या कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे याचा अभ्यास मानव बारकाईने व स्वतःच्या अनुभवावरुन करीत आहे. आपण केलेल्या चुका आपल्या मुलांच्या माध्यमातून पूर्ण करण्याच्या तयारीत तो आहे. फक्त शालेय शिक्षणाला महत्व न देता या शिक्षणाबरोबर आणखी नवीन काही शिकता येते की नाही याचा तो प्रत्येक क्षणी विचार करीत आहे. या विचारातूनच आपल्या मुलांने शालेय शिक्षणाबरोबर तांत्रिक/ व्यावसायिक विषयाचे कौशल्य आत्मसात करावे ही कल्पना सुचली. तेव्हा या ५८% पालकांनी या कल्पनेतूनच स्वतः विचार करुन या विभागांची निवड आपल्या पाल्यासाठी केली असावी.

-:कोष्टक क्र. ४.५.२:-

घाटक -२:- आपला मुलगा तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रमाचा उपयोग घरामधील काही वस्तु तयार करण्यासाठी करतो का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | २४ % |
| २ | नाही | ३८ | ७६ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.५.२ वरुन असे दिसून येते की, ७६ % विद्यार्थी आपल्या तांत्रिक कौशल्याचा घरामध्ये वापर करीत नाही. या तांत्रिक व व्यावसायिक विभागामध्ये - कारपेंटरी, इलेक्ट्रिशियन,

इलेक्ट्रॉनिक्स्, सिव्हील, ॲटो, पेंटींग व बुक बायंडिंग असे पुष्कळ अभ्यासक्रम आहेत. या सर्व अभ्यासक्रमांपैकी कोणत्याही एका अभ्यासक्रमाचा वापर आपण आपल्या घरामध्ये प्रयत्न म्हणून करु शकतो. परंतु पालकांच्या प्रतिक्रीयेवरुन विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल शंका आहे. तेव्हा पालकांनी स्वतःहून आपल्या मुलांना विश्वासात घेऊन सदर विषयाबद्दलचे कौशल्य आजमावण्याची संधी प्राप्त करुन द्यावी यामुळे त्याची भीती नाहीशी होईल व हळूहळू त्या विषयाचा वापर तो आपल्या घरामध्ये निर्भीडपणे करु शकेल. कारण त्याच्या जवळ कौशल्य आहे फक्त ते काम करु का नको याबद्दल थोडीशी भीती आहे असे वाटते.

-:कोष्टक क्र. ४.५.३:-

घटक-३:- आपल्या मुलाच्या शाळेमधील शैक्षणिक वातावरणाबद्दल प्रसन्न आहात का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३७ | ७४ % |
| २ | नाही | १३ | २६ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.५.३ वरुन असे दिसून येते की, ७४% पालक आपल्या मुलाच्या शाळेमधील शैक्षणिक वातावरणाबद्दल प्रसन्न आहेत.

सदर पालक प्रतिसादकांची संख्या जास्त आहे. म्हणजेच सोलापूर शहरातील जवळजवळ सर्वच तांत्रिक व व्यावसायिक विभाग आपल्या शैक्षणिक कामगिरीबद्‌दल प्रगतीपथावर आहेत असे दिसून येते. त्यांना हा दर्जा कायम टिकवून ठेवणे गरजेचे आहे. तरच विद्यार्थी व पालक आपल्या या विभागाकडे आकर्षित होतील आणि तांत्रिक व व्यावसायिक विषयाचे महत्व वाढण्यास मदत होइल.

-:कोष्टक क्र. ४.५.४:-

घटक-४:- आपल्या मुलाचा अभ्यास पहिल्यापेक्षा आता समाधानकारक आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४५ | ९० % |
| २ | नाही | ०५ | १० % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.५.४ वरुन असे लक्षात येते की, ९० % पालक प्रतिसादक आपल्या मुलाच्या अभ्यासक्रमाबद्‌दल प्रसन्न आहेत. खरोखरच तांत्रिक व व्यावसायिक विषयाबद्‌दल सर्व पालक समाधानी आहेत. म्हणजेच पालकांना आपल्या मुलांमध्ये थोडासा बदल झालेला दिसत असावा. सदर तांत्रिक विषयाचे कौशल्य त्याने मुलभूत स्वरुपात आत्मसात केले असावेत. तसेच हे तांत्रिक कौशल्य त्यांच्या राहणीमानावरुन थोड्याफार प्रमाणात दिसून येत असावेत. त्याच्या अवती-भोवती काही साधने-साहित्य

पडलेले असावेत आणि त्याचा वापर तो आपल्या दैनंदिन व्यवहारात करीत असावा. या हत्यारांचा वापर तो कौशल्यपूर्वकरित्या करीत असावा.

या सर्व गोष्टींवरुन पालक वर्ग थोडासा समाधानी झाला असावा परंतु आपल्या पाल्याच्या गुणवत्तेकडे देखील लक्ष दयावे कारण या तांत्रिक विषयाबरोबर इतर विषयांच्या अभ्यासाचा देखील समावेश असतो. उदा. मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान व समाजशास्त्र. हे सर्व विषय व तांत्रिक विषय यांची सरासरी काढून गुण मिळत असतात. तेव्हा फक्त तांत्रिक विषयाचा विचार करुन या ठिकाणी चालत नाही त्यासाठी सर्व विषयांकडे देखील सारख्या प्रमाणात लक्ष देणे आवश्यक आहे. काही मुले तांत्रिक विषयात प्राविण्य मिळवितात व कौशल्य संपादन करतात परंतु त्यांचे इंग्रजी व गणित फारच कच्चे असते. अशावेळी एस.एस.सी. ची परीक्षा उत्तीर्ण होणे कठीण जाते.

-:कोष्टक क्र. ४.५.५:-

घटक-५:- भविष्यात आपल्या मुलाने कोणता मार्ग निवडावा असे आपणांस वाटते?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | २२ | ४४ % |
| २ | स्वतःचा उदयोग | २८ | ५६ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

कोष्टक क्रमांक ४.५.५ वरुन असे दिसून येते की, ५६% पालक प्रतिसादकांची आपल्या मुलाने स्वतःचा उद्योग सुरु करावा अशी इच्छा आहे.

खरोखरच समाजामधील सद्यःस्थिती पाहता व शासनाचे सतत बदलणारे नोकरी विषयक नियम पाहता लोक निराश झालेले दिसतात तेव्हा आपल्या मुलांनी एखादा छोटासा उद्योग सुरु करावा व त्यासाठी शासनाची मदत घ्यावी अशी त्यांची इच्छा आहे. परंतु नोकरी पाहिजे म्हणून आता शासनाकडे जाऊ नये. कारण शासनाची नोकरी करणारे काही नोकरदार अतिरिक्त जागांमुळे कमी होत आहेत. अशा स्थितीत या नोकरीचा हट्ट धरणे ठीक नाही. आपला उद्योग सुरु करावा, अनुदानासाठी शासनाची थोडीफार मदत घ्यावी तरच या देशातील बेकारी कमी होईल. असे जागृत पालक आपले मत व्यक्त करतात.

-:कोष्टक क्र. ४.५.६:-

घाटक-६:- आपल्या मुलाला अधिक गुण मिळावे म्हणून खाजगी टयूशन लावली आहे का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ४८ | ९६ % |
| २ | नाही | ०२ | ०४ % |
| | एकूण................ | ५० | १०० % |

कोष्टक क्रमांक ४.५.६ वरुन असे दिसून येते की, ९६% पालक प्रतिसादकांनी आपल्या मुलाने खाजगी ट्यूशन लावली आहे असा प्रतिसाद दिला आहे.

सोलापूर शहरामध्ये खाजगी ट्युशनचे प्रमाण जास्त आहे असे वाटते. वरील कोष्टकावरुन जवळजवळ सर्वच मुले खाजगी ट्यूशनमध्ये अडकलेले आढळतात. याचा अर्थ असा की शाळेमधील शिक्षकांचे अर्धे काम या ट्यूशनने कमी केले. इंग्रजी व गणित या विषयांच्या तयारीसाठी पालक आपल्या मुलांना या ट्यूशन कडे पाठवितात. काही पालक मुले सतत अभ्यासात असावेत म्हणून ट्यूशन, काही पालक आपल्या मुलाचे शंका निरसन ताबडतोब व्हावे म्हणून , काही पालक गुणवत्तेसाठी, काही पालक शेजारचा मुलगा जातो म्हणून या व अशा अनेक कारणांमुळे पालकांनी आपल्या मुलाला ट्यूशनसाठी पाठविले.

-:कोष्टक क्र. ४.५.७:-

घटक-७:- आपल्या मुलाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाळेमध्ये जाऊन संबंधीत शिक्षकांना भेटता का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १६ | ३२ % |
| २ | नाही | ३४ | ६८ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

वरील कोष्टक क्रमांक ४.५.७ वरुन असे दिसून येते की, ६८% पालक आपल्या मुलाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संबंधित शिक्षकांना भेटत नाहीत. पुष्कळ पालक आपल्या पाल्याची प्रगती व सद्यःस्थिती याचा आढावा घेण्यासाठी संबंधीत शाळेत चौकशीसाठी जात नाहीत असे चित्र दिसते.

खरे पाहाता पालकांनी खाजगी ट्यूशन लावण्यापेक्षा वेळोवेळी शाळेमध्ये जाऊन आपल्या मुलाच्या प्रगतीची चौकशी करुन त्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेऊन कच्चे असणारे विषय कोणत्या प्रकारे सुधारावेत याची चर्चा करावी व स्वतः त्याच्याकडून घरीच अभ्यास करुन घ्यावा. शाळेमध्ये शिक्षक व घरी आपण स्वतः तयारी करुन घेतली तर नक्कीच गुणवत्तेमध्ये फरक पडेल. काही पालकांना अभ्यास घेणे शक्य नसेल तर त्यांनी मुलांच्या अभ्यासावर लक्ष ठेवण्याचे कार्य करावे.

-:कोष्टक क्र. ४.५.८:-

घटक-८:- आपल्या मुलाचे प्रगती पुस्तक पाहून आपणास बरे वाटते का?

| अ.क्र. | प्रतिसाद | प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ०८ | १६ % |
| २ | नाही | ४२ | ८४ % |
| | एकूण............... | ५० | १०० % |

कोष्टक क्रमांक ४.५.८ वरुन असे दिसून येते की, ८४% पालक प्रतिसादक आपल्या मुलाच्या प्रगती पुस्तकातील गुणांबद्दल समाधानी नाहीत.

बहुधा कोणतेही पालक आपल्या मुलाच्या प्रगतीबद्दल समाधानी नसतात. आपल्या मुलाला ८०% - ९०% गुण प्राप्त व्हावेत अशी त्यांची मनोमन इच्छा असते. सर्वच मुलांना या आकडेवारी पर्यन्त पोहचणे शक्य नसते. तेव्हा पालकांनी त्याच्या बुद्धिमत्तेचा विचार करावा व सुरुवाती पासून त्याला कित्ती गुण मिळत आलेले आहेत याचा थोडा आढावा घेवून त्या प्रमाणे त्याच्या कडून अपेक्षा करावी. ४५ % - ५०% गुण पहिल्या पासून मिळत असतील तर ५०% ते ६०% गुण त्याला पडावेत अशी अपेक्षा ठेवावी. एकदम ८० टक्केच पडावेत हे शक्य नाही. तेव्हा आपल्या मुलाच्या कुवतीनुसार त्याला प्रोत्साहन दयावे अतिरेक चांगला नसतो.

## ४.६ प्रत्यक्ष भेटीव्दारे मिळालेली संकलित माहितीः-

- सोलापूर शहरातील तांत्रिक व व्यावसायिक शाळांना दिलेल्या प्रत्यक्ष भेटीव्दारे मिळालेल्या संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचनः-

संशोधकाने सोलापूर शहरातील एकूण १२ माध्यमिक व उच्च माध्यमिक तांत्रिक / व्यावसायिक शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. या प्रत्यक्ष भेटीतून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

प्रत्यक्ष दिलेल्या भेटीमध्ये असे दिसून आले की, १०० टक्के तांत्रिक व व्यावसायिक विभाग हे आपल्या स्वतःच्या इमारतीमध्येच चालतात. मुख्य इमारतीच्या एका बाजूस या विभागासाठी प्रशस्त कार्यशाळा, कार्यालय व वर्ग खोल्या दिलेल्या आहेत.

पूर्ण संस्थे मध्ये एकच ग्रंथालय असून त्या ग्रंथालयाचा वापर शाळेमधील इतर सर्व विभाग करतात. तांत्रिक विभागाचे विद्यार्थी त्या ठिकाणी जाऊन आपल्याला हवे असलेले पुस्तक प्राप्त करतात. ग्रंथालयामध्ये पुस्तके घेऊन वाचण्याची व अभ्यास करण्याची सोय आहे. काही शाळांत मात्र फक्त पुस्तक मिळण्याची सोय आढळली. परंतु ग्रंथालयामध्ये उपलब्ध पुस्तकांपैकी तांत्रिक व व्यावसायिक विभागाची पुस्तके अत्यंत कमी प्रमाणात होती. त्यामध्ये जास्त पुस्तके इंग्रजी भाषेत आढळली . मराठी भाषेत क्वचितच पुस्तके दिसली.

ज्या ठिकाणी वर्गात अध्यापन व अध्ययन कार्य चालते ते वर्ग प्रशस्त आहेत. त्या वर्गांना भरपूर खिडक्या व मोठे दार असल्याकारणाने वर्गातील वातावरण स्वच्छ, हवेशीर, प्रकाशमय व प्रसन्न वाटले. वर्गामध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंच व शिक्षकांसाठी मोठा पसरट टेबल व खुर्च्या आहेत. मोठ-मोठ्या सुबक आकृत्या काढण्यासाठी एक मोठा फलक विद्यार्थ्यांच्या समोरच्या भिंतीवर आहे. वर्गाच्या आतील भिंती निर-निराळ्या आकृत्या, हत्यारे व माहितीच्या तक्त्यांनी बोलक्या केलेल्या आहेत.

विविध विषयांच्या विविध कार्य शाळा साहित्यांनी गजबजलेल्या आढळल्या. काही शाळांत एकाच मोठ्या खोलीत हे विविध विषय साहित्य आढळले. कार्यशाळेमधील विविध प्रशिक्षण विषयांना लागणाऱ्या हत्यारांची माहिती करून घेतली. काही शिक्षक विद्यार्थ्यांना आपल्या विषयाचे प्रशिक्षण देत होते. कार्य शाळेमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कार्यातून

उत्पन्न होणाऱ्या ध्वनीचा आवाज गुंजत होता. त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रशिक्षणातून निर्माण केलेल्या वस्तुंचा संग्रह दाखविला. खरोखरच बाजारातील वस्तु आणि या प्रशिक्षणातून निर्माण झालेल्या वस्तुंमध्ये थोडा देखील फरक जाणविला नाही.

१०० प्रशिक्षक अध्यापनाचे कार्य व्यवस्थितपणे करताना आढळले. तांत्रिक व व्यावसायिक विभागाचे काम जास्त आहे. सदर शिक्षकांना शाळेतील अर्धा वेळ विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी दयावा लागतो व उरलेला अर्धा वेळ विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या जॉबचे अगदी बारकाईने चिकित्सक निरीक्षण करण्यास दयावा लागतो. काही शाळेमध्ये शाळा भरल्यानंतर मधली सुट्टी पर्यन्त वर्ग अध्यापन चालते व त्यानंतर विदयार्थी कार्यशाळेत येवून विविध कौशल्याचे प्रशिक्षण घेतात. खरोखर तांत्रिक शिक्षक हे अगदी तंत्रशुद्ध पद्धतीने आपल्याला अवगत असलेले कौशल्य विदयार्थ्यांना शिकवीत होते. तांत्रिक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना शालेय वातावरण मानवणारे आहे. तांत्रिक शिक्षकांना प्रशिक्षणानंतर मिळणारा वेळ हा रिकामा वेळ नाही व या वेळेत ते इतर गप्पा गोष्टी करतात असे नाही तर या रिकाम्या वेळेचा ते सद्‌-उपयोग करतात, प्रशिक्षणापूर्वीचा वेळ प्रशिक्षणाच्या नियोजनासाठी खर्च होतो व नंतरचा वेळ हा जॉबचे निरीक्षण करण्यासाठी. त्यामुळे शाळेतील प्रमुख हा रिकामा वेळ आहे म्हणून या शिक्षकांकडून इतर कामे करून घ्यावीत असा विचार करतात. काही ठिकाणी तांत्रिक शिक्षक स्वतः शाळेतील पेंटींगचे काम, सुतारकाम, इलेक्ट्रिक काम करीत असलेले दिसून आले. परंतु या कामाचा त्यांना मोबदला मिळणार नाही असे निराश होऊन त्या शिक्षकांनी आपले शब्द व्यक्त केले.

इतर माध्यमिक शिक्षक व त्याच शाळेत त्याच वर्गाला तांत्रिक व व्यावसायिक विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनामध्ये तफावत आढळली. इतर माध्यमिक शिक्षक व तांत्रिक शिक्षक विद्यार्थ्यांना यशस्वी करण्यासाठी, गुणवत्ता वाढ होण्यासाठी झटत असतात. परंतु वेतनामधील फरकामुळे थोडे निराश वाटले. तरी देखील ते शिक्षक अगदी तन्मयतेने व जिद्दीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहेत याचा अभिमान वाटला.

जवळजवळ सर्वच तांत्रिक व व्यावसायिक शाळांसाठी क्रीडांगण आहे. या क्रीडांगणावर विविध प्रकारच्या खेळांची मांडणी केलेली दिसली. उदा. लांब उडी, व्हॉलीबॉल, फुटबॉल, क्रिकेट , सिंगल बार, डबल बार, मल्लखांब, रोप वलायबिंग, खो-खो आणि कबड्डी इत्यादी खेळांचे आयोजन करण्यासाठी सज्ज असलेली क्रीडा मैदानं आढळली. बौद्धिक कौशल्याबरोबर शारीरिक कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी देखील या शाळां समर्थ आहेत असे वाटले. या भव्य क्रीडांगणावर विविध स्पर्धांचे आयोजन होते. भेटीच्या वेळेस काही शाळांमध्ये क्रीडा दिन असल्यामुळे मुले आपल्या खेळात गुंतलेले होती.

खरोखरच शिक्षकांनी अगदी जिद्दीने व बारकाईने आपल्या कामाची नोंद ठेवल्यास भविष्यात तांत्रिक व व्यावसायिक शाळांचे उज्ज्वल दिवस पहावयास मिळतील. त्याच बरोबर शिक्षकांचे इच्छित स्वप्न देखील पूर्ण होईल.